चला स्विमिंग ला...
स्विमिंग सुट, गॉगल, स्विमिंग कॅप, बरमुडा स्विमिंग लेगींग्ज टॉप, व बरेच काही
जरीवाला
कापड बाजार, फोन नं. 7666510765
यशोदानगर, पाईपलाईन रोड,
सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, योगेश मेडीकल शेजारी, पुणे. मो. 7775089505



संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

RAM COOLERS
खास नागपुरचे
अती थंडावा देणारे एअर कुलर
गिरीराज इलेक्ट्रॉनिक्स्
• कमर्शियल
• हॉटेल
• मंगलकार्यालय
• घरगुती
11 am to 8 pm
DUREX
Namdhari
घुमरे गल्ली, आसरा स्टेशनर्स समोर, अ.नगर.
9665849777/8208349164

रजि नं. ११४३९–५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, गुरुवार दि. ०८.०५.२०२५ | अंक नं. ३२ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

प्रशस्त दालन प्रशस्त वाहनतळ होलसेल विभाग विनम्र सेवा
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

12वी तील यशस्वी विद्यार्थ्यांसाठी
गोल्डन ऑफर
चेन व अंगठी खरेदीवर मिळवा
आपल्याला मिळालेल्या टक्केवारीएवढी
मजुरीत सूट*
योजना 9 मे 2025 पर्यंत लागू.
योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी आपल्या मुळ मार्कशीटची झेरॉक्स प्रत स्वतः घेवून येणे आवश्यक.
5 मे रोजी लागलेल्या 12वीतील निकालानुसार
सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन.
चंदुकाका ज्वेल्स
सोनेरी नातं..
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड,
सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
बुधवार चालु
22 कॅरेट सोन्याचा सर्वात कमी दर
दागिन्यांच्या मजुरीवर 20%* पर्यंत सूट
ठुशी, कुंदन ज्वेलरीच्या मजुरीवर 50%* पर्यंत सूट
आपला जुना दागिना एक्सचेंज करा आणि मिळवा 100%* किंमतीचा परतावा.

# स्कॉर्पिओला ‘आरटीओ’चा लोगो वापरुन व ‘खाकी’ घालून वाहनचालकांकडून पैसे उकळण्याचा ‘तोतया’कडून प्रयत्न

नगर – आरटीओ कार्यालयाचा लोगो असलेले स्टीकर चिकटवलेल्या पांढऱ्या रंगाच्या स्कॉर्पिओ गाडीत खाकी गणवेश घालून फिरत मालवाहतूक करणाऱ्या वाहनचालकांना थांबवून त्यांच्याकडून दंडाच्या नावाखाली पैसे उकळण्याचा प्रयत्न करणाऱ्या तोतया आरटीओ अधिकारी व त्याच्या एका सहकाऱ्याला नगरच्या आरटीओ कार्यालयाच्या पथकाने पकडले असून त्यांच्यावर पाथर्डी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(वृत्त व छायाचित्र पान २ वर)

एक अगरबत्तीचा सुवास दरवळेल दूरवर....
इंडियन कस्तुरी प्रिमियम मसाला अगरबत्ती
५० व २५० ग्रॅम बॉक्स पॅकिंग मध्ये उपलब्ध
Indian Kasturi
तसेच केशरचंदन, शाहीऊद, हिना कस्तुरी, महालक्ष्मी, कस्तुरीचंदन अगरबत्ती व धुप
शुभलाभ(६ ईन १ पाऊच रु.६० चा ५० मध्ये)
केवल अगरबत्ती
हॉटेल रसरंग समोर, आडते बाजार, अ.नगर.
३ फुट पासुन पुढे अल्युमिनीयम लॅडर (शिडी) उपलब्ध

सर्व कामगार बंधु आणि भगिनींना जागतिक कामगार दिनाच्या शुभेच्छा !
या निमित्ताने
इंडो आयरिश हॉस्पिटल
तपोवन रोड, सावेडी, अहिल्यानगर. फोन 0241-2423336
मो. 9130423336 * 9860310001
तर्फे
मोफत सर्वरोग तपासणी
दि. १ मे ते १० मे २०२५ रोजी स. १० ते ५ वा.
• सर्व तपासणीवर ५०% पर्यंत सवलत
Star Health, Sbi General Insurance, Oriental Health Insurance & All Tpa, National Insurance, Tata Aig General Insurance, ICICI Lombard, Bajaj Allianz, Reliance Insurance Company, Universol Sampo, Manipal Cigna, IFFCO TOKIO, HDFC ERGO, Medi Assist, Future Genrali
व इतर सर्व कॅशलेस इंशुरन्स उपलब्ध
उपलब्ध सुविधा
सर्व रोग निदान व उपचार
• जनरल सर्जरी (हार्निया, अपेंडीक्स व इतर सर्व शस्त्रक्रिया)
• कार्डियाक (कॅथलॅब, अॅन्जीओप्लास्टी)
• युरोलॉजी (डायलिसीस, किडनीस्टोन, प्रोस्टेट सर्जरी)
• मेडिसीन (डायबेटिस, ह्रदयाचे आजार, स्ट्रोक, ब्लडप्रेशर)
• ऑर्थोपेडिक (सांधेदुखी, पाठदुखी, सांधे प्रत्यारोपन)
• स्त्रीरोग व प्रसुतिशास्त्र (वंध्यत्व निवारण, वेदनाविरहीत प्रसुती)
• बालरोग व नवजात रोगशास्त्र
• ऑन्कोलॉजी (सर्जरी व किमोथेरपी)
• पॅथॉलॉजी
• रेडिओलॉजी
• सिटीस्कॅन
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना
आयुष्मान भारत योजना
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगारांसाठी
२४ तास आपत्कालीन व ॲम्ब्युलन्स सुविधा उपलब्ध

पुरुषांसाठी
जम्बो साईज
ऑनलाईन पेक्षा स्वस्त
टी-शर्ट/शर्टस्
फॉरमल पँट/ट्राऊजर्स
व सर्व प्रकारचे कपडे
डिरकाउंट रेटमध्ये
शुभ मॉल

हरवला आधारवृक्ष
राहिली आठवणींची पाने..
कुठे शोधावी अशी सावली
आता आमच्या मनाने..



स्व. आ. अरूणकाका जगताप

भावपूर्ण श्रध्दांजली

दशक्रिया विधी

रविवार दि. ११ मे २०२५ रोजी सकाळी ७ वा.
अमरधाम, नालेगाव, अहिल्यानगर येथे.

आपल्या प्रेरणादायी स्मृतीस विनम्र वंदन

विजय नाथुजी धाडगे • प्रशांत विजय धाडगे
धाडगे कन्स्ट्रक्शन्स् , धाडगे ट्रान्सपोर्टस् (यशोदानगर, पाईपलाईन रोड, सावेडी, अहिल्यानगर)



सत्तेसाठी नव्हे...
सत्यासाठी लढले...

अहिल्यानगरचे ज्येष्ठ नेते व
माजी आमदार आदरणीय
स्व.अरुणकाका बलभीमराव जगताप
आपल्या पावन स्मृतीस
भावपूर्ण श्रध्दांजली

: शोकाकूल :

श्री.माधवराव लामखडे
उद्योजक तथा जि.प.सदस्य, अ.नगर

श्री. माधवराव लामखडे मित्र मंडळ
नगर–पारनेर

श्री. केतन माधवराव लामखडे मित्र मंडळ
समस्त ग्रामस्थ इसळक–निंबळक, ता.नगर

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

# खुनाच्या प्रत्नाच्या गुन्हयातील आरोपीचे नगरच्या सिव्हील हॉस्पिटलमधून पलायन

**स्थानिक गुन्हे शाखेने सिद्धार्थनगरच्या काटवनात केले जेरबंद**

नगर - जिल्हा शासकीय रुग्णालयात आयसीयु वार्ड मध्ये उपचार घेत असलेला खुनाच्या प्रयत्नाच्या गुन्ह्यातील आरोपी पोलिसांची नजर चुकवून दुसऱ्या एका आरोपीच्या मदतीने ७ मे रोजी पहाटे पळाला. मात्र सिद्धार्थनगरच्या काटवनात लपून बसलेल्या या आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पकडले आहे. संजय उर्फ गोंडया नितीन वैरागर (वय २२, रा.सोनई, ता.नेवासा) असे या आरोपीचे नाव आहे.

आरोपी वैरागर याच्यावर सोनई पोलिस ठाण्यात खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल झाला होता. या गुन्ह्यात तो फरार होता. मात्र त्याला २ मे रोजी सोनई येथील जमावाने पकडून मारहाण केली होती. त्यामुळे त्यास औषधोपचारकामी जिल्हा रूग्णालय येथे दाखल करण्यात आले होते. त्याच्या वर औषधोपचार चालू असताना तो पोलीसांची नजर चुकवून ७ मे रोजी पहाटे १२.१५ च्या सुमारास तेथे उपचार घेत असलेला दुसरा आरोपी ऋषिकेश बद्री गायकवाड (रा. गंगानगर, नेवासा) याच्या मदतीने पळून गेला होता. याबाबत सोनई पोलिस ठाण्याचे पो.कॉ. गोरक्षनाथ जावळे यांच्या फिर्यादी वरून तोफखाना पोलिस ठाण्यात दोघा आरोपींच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता.



जिल्हा रुग्णालयातून पलायन केलेल्या आरोपीला पकडल्यानंतर त्याच्या समवेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

आरोपी पलायन घटनेची माहिती मिळताच पोलिस अधिक्षक राकेश ओला यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. दिनेश आहेर यांना पथक तयार करुन आरोपीचा शोध घेण्याचे आदेश दिले. त्यानुसार पो.नि. आहेर यांनी उपनिरीक्षक तुषार धाकराव व पोलीस अंमलदार ज्ञानेश्वर शिंदे, संदीप पवार, फुरकान शेख, रविंद्र घुंगासे, मयुर गायकवाड, बाळासाहेब नागरगोजे, मेघराज कोल्हे व चंद्रकांत कुसळकर यांचे पथक तयार करुन आरोपींचा शोध घेणेकामी रवाना केले. सदर पथक पळून गेलेल्या आरोपीचा गोपनीय व तांत्रीक विश्लेषणाच्या आधारे शोध घेत असताना तो सिध्दार्थनगर येथील काटवनात असल्याची माहिती मिळाली. मिळालेल्या माहितीवरून पथकाने सिध्दार्थनगर येथील सारडा कॉलेज पाठीमागील काटवनात संशयीत आरोपीचा शोध घेऊन त्यास पकडले. त्याला पुढील तपास कामी सोनई पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

# कारागृहाचे गज कापून पळून जाण्याच्या आरोपीचा प्रयत्न

## झटापटीत पोलिस कर्मचारी जखमी

नगर - कारागृहातील बराकीचे पुढील बाजुचे दोन गज कापून पळून जाण्याचा प्रयत्न एका आरोपीने केला. या आरोपीला बंदोबस्तावरील पोलिस कर्मचाऱ्याने पकडले. मात्र त्यावेळी झालेल्या झटापटीत पोलिस कर्मचारी जखमी झाल्याची घटना कर्जत येथील दुय्यम कारागृहात ७ मे रोजी सकाळी ७.१५ वाजण्याच्या सुमारास घडली.

याबाबत पो.कॉ. लहू रामा घोलवाड यांनी कर्जत पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. कर्जत येथील दुय्यम कारागृहात आरोपी तलाश उर्फ धब्या उर्फ तुषार रंज्या उर्फ शिवा काळे (वय २६) हा बंदिस्त होता. त्याला बराक क्र.३ मध्ये ठेवण्यात आलेले होते. ७ मे रोजी सकाळी ७.१५ च्या सुमारास आरोपी तलाश याने लॉकअपचे समोरील बाजुचे २ गज कशाच्या तरी साहाय्याने कापून तो पळून जाण्याच्या प्रयत्नात असताना तेथे बंदोबस्तासाठी नेमण्यात आलेले पो.कॉ. लहू घोलवाड यांच्या निदर्शनास ही बाब आली. त्यांनी आरोपी तलाश याला झडप घालून पकडले. त्यावेळी त्याने घोलवाड यांच्याशी झटापट केली. या झटापटीत ते जखमी झाले. मात्र त्यांनी आरोपीला पकडून ठेवले. या ठिकाणी झालेला आराडाओरडा ऐकून इतर पोलिस कर्मचारी तेथे आले. त्यांनी आरोपीला पकडून पुन्हा कारागृहात बंदिस्त केले. त्यानंतर जखमी झालेल्या पो.कॉ. लहू घोलवाड यांच्या फिर्यादीवरुन कर्जत पोलिस ठाण्यात आरोपी तलाश याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २६२, १३२, १२१ (१) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# प्रेरणादायी अक्षरधन...






## सुट्टी म्हणजे मनपसंत कामे करण्याची सुवर्णसंधी

मे महिना आला की विशेषतः शालेय विद्यार्थ्यांचा आनंदाचा पाराही चढतो. चौकटीतला आणि बऱ्याच विद्यार्थ्यांना बोर वाटणारा अभ्यासाचा काही काळ त्रास नसतो.

थोडक्यात मुलांच्या आयुष्यात सुट्टी म्हणजे सर्वात आवडीचा अन् नवसंजीवनी देणारा काळ असतो. म्हणूनच हा वेळ टीव्ही, मोबाईलमध्ये अधिक वाया न जाता त्याचा सदुपयोग त्यांच्या आवडीचे छंद, वाचन, खेळ, प्रवास, संगीत श्रवण यासारख्या गोष्टींत करण्याची ही सुवर्णसंधी आहे.

विद्यार्थ्यांची आवडनिवड, त्यासाठी पालकांनी आवर्जून काढावयाची सवड, प्रोत्साहन यांच्यातून या मुलांच्या मनोरंजना बरोबर त्यांच्या भविष्याला काहीसा मोड देण्याचा प्रयत्न होणे महत्त्वाचे ठरेल.

सुट्टीच्या या धमाल दिवसांत मौजमजेसह योग्य शारीरिक व मानसिक विश्रांतीही घ्यावी. त्यासाठी पालकांनी विशेषतः नोकरदार वर्गानी नियोजन केले पाहिजे. खरंतर या निमित्ताने पालकांनासुद्धा सुट्टी साजरी करण्याची सुवर्णसंधी मिळते.

विद्याथीमित्रांनो, ज्याला जे वाटतं ते ते छंद एन्जॉय करा. खेळा, शरीर बनवा, कलेची आवड जोपासा, विशेष छंद नसेल तर नवनवीन शोधा. स्वावलंबी बनून स्वतःच्या पायावर लवनकर उभे राहायचे असल्यास कामे करण्याचीही तयारी ठेवा. पार्टटाईन किंवा रोजगाराभिमुख कोर्सेस करा. आर्थिक साक्षर बनण्याचा प्रयत्न करा. नानाविध अनुभव घेण्याचा प्रयत्न करा. हा उपदेश नाही तर मित्रत्वाचा सल्ला आहे. जीवनाच्या धकाधकीत पुढे पुढे जबाबदाऱ्या वाढून छंद व स्वतःला वेळ देणे कमी होऊ शकते. विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण व्यक्तिमत्त्व विकासाच्या दृष्टीने सहजतेने, हसतखेळत, अपेक्षांचे ओझे न टाकता पालकांनी सुट्टीच्या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा असे वाटते.

# कारवाईसाठी गेलेल्या पोलिसांवर हल्ला; हॉटेल व्यावसायिकासह ८ जणांवर गुन्हा दाखल

नगर - अवैध दारु विक्री करणाऱ्या हॉटेलवर कारवाईसाठी गेलेल्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला शिवीगाळ धक्काबुक्की करत हल्ला केल्याची घटना नेवासा तालुक्यातील भेंडा शिवारातील हॉटेल अमीत येथे ७ मे रोजी दुपारी १.५० च्या सुमारास घडली.

याबाबत पो.हे.कॉ. बापूसाहेब फोलाणे यांनी नेवासा पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी फोलाणे व त्यांच्या समवेत असलेले स्थानिक गुन्हे शाखेतील पोलिस अंमलदार हे पोलिस अधिक्षक राकेश ओला व स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. दिनेश आहेर यांच्या सूचनेनुसार अवैध दारू विक्री करणाऱ्या हॉटेल व्यावसायिकांवर कारवाई करण्यासाठी गेले होते. त्यांना भेंडा शिवारातील हॉटेल अमीत येथे अवैध दारू विक्री होत असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार त्यांनी हॉटेलवर छापा टाकला. तेथील मुद्देमाल व हॉटेल मालकाला ताब्यात घेऊन हॉटेलच्या बाहेर आले असता तेथे महेश बाळकृष्ण वाघडकर (वय २७), रामेश्वर सर्जेराव वाघडकर (वय २४), पोपट माधव वाघडकर (वय ५०), अंकुश गोरक्षनाथ वाघडकर (वय ३२), रामेश्वर बाबासाहेब गंगावणे (वय ३५), गयाबाई पोपट वाघडकर, छायाबाई बाळकृष्ण वाघडकर, मंगलबाई सर्जेराव वाघडकर (सर्व रा.भेंडा, ता.नेवासा) यांनी एकत्र येवून पोलिसांच्या पथकाला गचांडी धरुन धक्काबुक्की केली. तसेच ते करत असलेल्या शासकीय कामात अडथळा आणला, असे फिर्यादीत म्हटले आहे.

या फिर्यादीवरुन ८ जणांविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १३२, १२१ (१), २२१ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## मोबाईलची चोरी

नगर - भाजीपाला मार्केटमध्ये भाजीपाला घेत असताना झालेल्या गर्दीचा फायदा घेऊन अज्ञात चोरट्याने नजर चुकवून शर्टच्या खिशातून ४० हजार रुपये किंमतीचा आय फोन १४ प्रो हा मोबाईल चोरुन नेला. ही घटना पाईपलाईन रोडवरील यशोदानगर भाजी मार्केटमध्ये ६ मे रोजी सायंकाळी ७ वाजण्याच्या सुमारास घडली. याबाबत बाळासाहेब श्रीरंग ठोंबरे (वय ५८, रा. वाणीनगर, पाईपलाईन रोड) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन तोफखाना पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

# शिक्षकाला रात्रीच्या वेळी लुटण्यासाठी अडवून केले चाकूने वार

**स्टेशन रस्त्यावर लोखंडी पुलावरील घटना, तिघांवर गुन्हा दाखल**

नगर - रस्त्याने पायी जाणाऱ्या शिक्षकास मोपेडवर आलेल्या तिघांनी अडवून त्याच्याकडे पैशाची मागणी केली. परंतु त्याच्याकडे पैसे नसल्याने त्यांना मारहाण करत त्याच्याकडील मोबाईल हिसकावून घेण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी त्यांनी प्रतिकार केला असता दोघांनी त्यांच्या हातावर व पाठीवर चाकूने वार करुन जखमी केल्याची घटना रेल्वे स्टेशन रोडवरील लोखंडी पुलावर ६ मे रोजी पहाटे ३.४५ वाजण्याच्या सुमारास घडली.

याबाबत निखिल विकास बोरकर (वय ३४, रा. पुसद, यवतमाळ, हल्ली रा. स्टेशन रोड, आयकॉन पब्लिक स्कूल जवळ, आगरकर मळा) यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे पुसद येथे प्राथमिक विद्यालय येथे शिक्षक असून सध्या सुट्टी असल्याने ते नगरमध्ये आलेले होते. ६ मे रोजी पहाटेच्या सुमारास त्यांना श्वास घेण्यास त्रास होत असल्याने ते मोकळी हवा घेण्याकरिता घरापासून निघून हॉटेल उदयनराजे पर्यंत पायी चालत गेले. तेथून ते पुन्हा घराकडे जात असताना लोखंडी पुलाजवळ त्यांच्यामागून आलेल्या मोपेड गाडीवरील तीन अनोळखी इसमानी त्यांना मोपेड आडवी लावली व थांबण्यास सांगितले.

तुझ्याकडे काय पैसे असतील ते आम्हाला दे असे म्हणून फिर्यादीच्या पॅन्टचे खिसे तपासले. परंतु त्यांच्याकडे पैसे न सापडल्याने तिघांनी त्यांना मारहाण व शिवीगाळ केली आणि त्यांच्याकडील वन प्लस १० आर कंपनीचा मोबाईल हिसकावून घेण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी फिर्यादी यांनी त्यांना प्रतिकार केला असता तिघांपैकी दोघांनी त्यांच्याकडे असलेल्या चाकूने फिर्यादीच्या डाव्या हाताच्या दंडावर, उजव्या हाताच्या मनगटावर, तसेच पाठीवर, डोक्यावर वार केले. यावेळी फिर्यादीने केलेल्या आरडाओरडा केल्यामुळे मारहाण करणारे तिघे तिथून निघून गेले. मारहाणीत फिर्यादी हे गंभीर जखमी झाले.

याप्रकरणी निखील बोरकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन कोतवाली पोलिसांनी अज्ञात तिघांविरुद्ध बीएनएस २०२३ चे कलम ३१२,१२६ (२), ३ (५) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक प्रवीण पाटील करीत आहे.

## राजेंद्र मुनोत यांचे अल्प आजाराने निधन



नगर - बुरुडगाव रोडवरील अजय गॅसच्या मागील आदर्श कॉलनीतील रहिवासी, लुणिया-मुनोत असोसिएटचे संचालक राजेंद्र शांतीलाल मुनोत (वय ६७) यांचे ८ मे रोजी अल्प आजाराने निधन झाले.

त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, १ भाऊ, भावजय, २ मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. विनोद शांतीलाल मुनोत यांचे ते बंधू होत.

## सुजय जकाती यांचे अपघाती निधन



नगर - भूषणनगर येथील नम्रता कॉलनीतील रहिवासी सुजय श्रीराम जकाती (वय ३२) यांचे ७ मे रोजी रिक्षाच्या धडकेत अपघाती निधन झाले. त्यांच्यावर केडगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे आई, वडील, १ भाऊ, भावजय असा परिवार आहे.

# कलाकेंद्रातील नाचगाण्याच्या वादातून तरुणावर तलवारीने वार; चार महिलांसह ७ जणांवर खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल

नगर - कलाकेंद्रात नाचगाण्यावर पैसे लावण्याच्या कारणावरुन झालेल्या वादाचा मनात राग धरुन तरुणावर दोघांनी तलवारीने डोक्यात व पोटात वार करून खुनाचा प्रयत्न केला. तसेच इतरांनी त्याच्या मित्रास लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन शिवीगाळ करीत धमकी दिल्याची घटना सोनई ते राहुरी रोडवर, वंजारवाडी बस स्टॅन्डजवळ ५ मे रोजी रात्री १०.३० वाजण्याच्या सुमारास घडली.

या हल्ल्यात जखमी झालेल्या अक्षय रामदास चेमटे (वय २५, रा. घोडेगाव ता. नेवासा) यांनी एमआयडीसी पोलिस ठाण्यात ७ मे रोजी रात्री उशिरा फिर्याद दिली आहे. नगर तालुक्यातील खोसपुरी येथील जयभवानी कला केंद्र येथे ४ मे रोजी रात्री फिर्यादी व भरत पालवे, विशाल भरत पालवे (दोघे रा. पांढरीपूल, वांजोळी ता. नेवासा), सचिन साहेबराव डोळे (रा.डोळे वस्ती, वंजारवाडी ता.नेवासा) आणि कला केंद्रावरील चार महिला यांच्यात नाच गाण्यावर पैसे लावण्याच्या कारणावरुन वाद झाले होते. या वादाचा मनात राग धरुन ५ मे रोजी रात्री १०.३० वाजण्याच्या सुमारास फिर्यादी चेमटे व त्याच्या मित्राला सोनई ते राहुरी रोडवरील वंजारवाडी बसस्टँड जवळ भरत पालवे व इतरांनी अडवले. त्यावेळी भरत पालवे व विशाल पालवे यांच्या हातात तलवारी होत्या. त्यावेळी फिर्यादी हा त्यांना समजावून सांगत असताना भरत पालवे याने अचानक त्याच्या हातातील तलवारीने फिर्यादी याच्या डोक्यात वार केला व सचिन डोळे याने त्याच्या हातातील तलवार फिर्यादीच्या पोटात खुपसली. ती तलवार फिर्यादी यांनी हातात धरल्याने फिर्यादीच्या हाताला व पोटाला मोठी जखम झाली. तसेच यावेळी कला केंद्रावरील चार महिलांनी फिर्यादी याचा मित्र सचिन महादेव दराडे यास लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन शिवीगाळ केली. या मारहाणीत फिर्यादी हा गंभीर जखमी झाला. दवाखान्यात उपचार घेत असताना त्याने एमआयडीसी पोलिसांना दिलेल्या जबाबावरून पोलिसांनी ४ महिलांसह ७ जणांवर बी एन एस २०२३ चे कलम १०९, ११९ (१), ११८ (१), ११५ (२), १८९ (२), १९१ (२) (३), १९० प्रमाणे खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल केला. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक मोढे हे करीत आहेत.

## कलाकेंद्रावरील महिलांचे पोलिस अधीक्षकांना निवेदन

दरम्यान खोसपुरी येथील जय भवानी सांस्कृतिक कला केंद्रावरील महिलांनी पोलिस अधिक्षक राकेश ओला यांना ७ मे रोजी दुपारी निवेदन दिले. कला केंद्रावर ४ मे रोजी रात्री १२ ते १ वाजेच्या सुमारास काही युवक मद्यधुंद अवस्थेत आले होते व त्यांनी आतमध्ये प्रवेश करून आम्हाला पार्टी लावायची आहे. आत्ताच्या आत्ता आमची पार्टी लावा तेव्हा महिलांनी त्यांना सांगितले की आमचे कला केंद्र बंद झाले आहे, असे सांगितले असता त्या युवकांना राग आला व त्यांनी महिलांना अपशब्द वापरत शिवीगाळ, लाथाबुक्याने मारहाण केली.

त्यानंतर ४ ते ५ मोटरसायकल वरून ८ ते १० युवक हे हातात तलवार, काठ्या, गज घेऊन आले. त्यांनी महिलांच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र बळजबरीने हिसकावून घेऊन गेले आहे. कला केंद्रातील महिलांना देखील हे तरुण धमकी देत असून या तरुणांना लवकरात लवकर अटक करून योग्य ते कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली. यानंतर एमआयडीसी पोलिस ठाण्यात एका महिलेने दिलेल्या फिर्यादी वरून पोलिसांनी अक्षय रामदास चेमटे (रा. घोडेगाव), सचिन महादेव दराडे, आकाश मच्छिंद्र दराडे (दोघे रा.वंजारवाडी, ता. नेवासा) या तिघांवर मारहाण करणे, जीवे मारण्याची धमकी देणे या कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## डॉ. कृष्णा उर्फ बापूसाहेब अनारसे यांचे निधन



नगर - येथील भुलतज्ञ डॉ. कृष्णा उर्फ बापूसाहेब अनारसे (वय ५५) यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी, दोन मुले, आई, वडील, दोन बहिणी असा परिवार आहे. मनमिळाऊ व हसतमुख स्वभाव यामुळे डॉ. अनारसे सर्वदूर परिचित होते. आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या नेत्रालयासह शहरातील विविध हॉस्पिटलमध्ये ते यशस्वी भूलतज्ञ म्हणून कार्यरत होते. स्नेहबंध १९८५ परिवाराच्या वतीने डॉ. कृष्णा अनारसे यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

## कुंडलिक निमसे यांचे वृध्दपकाळाने निधन



नगर - नगर तालुक्यातील मांडवे येथील ज्येष्ठ वारकरी कुंडलिक मनाजी निमसे (वय ८६) यांचे ७ मे रोजी वृध्दपकाळाने निधन झाले. त्यांच्यामागे मुलगा, मुलगी, सून, नातवंडे असा परिवार आहे.

कुंडलिक निमसे हे गेल्या अनेक वर्षांपासून पायी आषाढी वारी करीत होते. सुमारे १५ वर्षांपासून मांडवे ते पंढरपूर अशी रामकृष्ण हरी पायी दिंडी सुरू करण्यात आली आहे. हा दिंडी सोहळा सुरू करण्यात त्यांचा मोठा वाटा होता. दिंडी दरम्यान वारकऱ्यांना ते अन्नदान करत असत.

## चांगुणाबाई बनसुडे यांचे अल्पशा आजाराने निधन



श्रीगोंदा - शहरातील बनसुडे मळा येथील चांगुणाबाई शिवराम बनसुडे यांचे ७ मे रोजी हॉस्पिटलमध्ये उपचाराच्या दरम्यान अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पाठीमागे पती शिवराम बापू बनसुडे यांच्यासह २ मुले व १ मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

श्रीगोंदा शहरातील वृत्तपत्र विक्रेते तसेच महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष, मेडिकल व्यवसायीक माधवराव शिवराम बनसुडे यांच्या मातोश्री होत.

## कावेरीबाई सारडा यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - बीड नाथापुरा येथील रहिवासी श्रीमती कावेरीबाई रामविलास सारडा (वय ८५) यांचे ७ मे रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर नाथापुरा बीड येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे १ मुलगा, २ मुली, जावई, सुना, नातवंडे असा परिवार आहे. गोविंद सारडा यांच्या त्या मातोश्री होत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# वाहनचालकांकडून पैसे उकळण्याचा 'तोतया आरटीओ' कडून प्रयत्न

(पान १ वरुन)

याबाबत नगरच्या आरटीओ कार्यालयातील मोटार वाहन निरीक्षक सुनिल मधुकर पाटील यांनी फिर्याद दिली आहे. याबाबतची माहिती अशी की, ट्रान्सपोर्ट व्यावसायिक केवल जग्गी यांच्या मालकीचा मालट्रक (क्र. एम एच १६ ए ई १०४४) त्यांचा चालक अशोक नरहरी पांचाळ (रा. शिवाजीनगर, बीड) हा ७ मे रोजी सकाळी ७.३० च्या सुमारास नगरकडून बीडकडे घेवून जात असताना पाथर्डी तालुक्यातील देवराई गावाजवळ त्याच्या मागून आरटीओ कार्यालयाचा लोगो असलेले स्टीकर चिकटवलेली पांढऱ्या रंगाच्या स्कॉर्पिओ गाडी आली. त्यातील एक जण ट्रक चालकाला गाडी बाजूला घे असे म्हणाला. त्यानंतर त्या स्कॉर्पिओमधून खाकी गणवेश घातलेले एक अधिकारी उतरले व त्यांनी ट्रकचालकाला तुझ्या गाडीचे फिटनेस प्रमाणपत्र संपलेले आहे. तुला ६४ हजार दंड भरावा लागेल असे सांगितले.

त्यामुळे चालकाने ट्रक मालक जग्गी यांना फोन लावला, फोनवर जग्गी हे त्या अधिकाऱ्याशी बोलले असता त्याने तडजोडीअंती २५ हजार रुपये द्यावे लागतील व ते पैसे ५ मिनिटात अजय पानवाला यांच्या फोन पे वर पाठवा असे सांगत एक नंबर दिला. जग्गी यांना त्या अधिकाऱ्याचा संशय आल्याने त्यांनी कॉन्फरन्स कॉल वर मोटार मालक कल्याणकारी संघटनेचे अध्यक्ष बाबा सानप यांच्याशी संपर्क साधला. सानप त्या अधिकाऱ्याशी बोलले असता त्याने आपण वडाळा आरटीओमधून सूर्यवंशी बोलतोय आणि सरकारी कामानिमित्त मुंबईहून बीडला चाललो असल्याचे सांगितले. सदर कॉलची रेकॉर्डिंग बाबा सानप यांनी नगरचे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद सगरे यांना पाठवून या अधिकाऱ्याबाबत संशय व्यक्त केला.



'तोतया आरटीओ' ला त्याचा साथीदार आणि पांढऱ्या रंगाच्या स्कॉर्पिओ गाडीसह ताब्यात घेतल्यावर नगरच्या आरटीओ कार्यालयाचे व पाथर्डी पोलिसांचे पथक.

आरटीओ सगरे यांनी लगेच मोटार वाहन निरीक्षक सुनिल पाटील यांना फोन करून सखोल चौकशी करण्यास सांगितले. पाटील यांनी लगेच त्या ६४०४ नंबर असलेली स्कॉर्पिओ गाडी कोणत्या ठिकाणची आहे याची महाराष्ट्रभर चौकशी केली असता सदर गाडी ही ठाणे आरटीओ कार्यालयाची असल्याचे समोर आले. मात्र त्यांची गाडी त्यांच्या कार्यालयात असल्याचीही माहिती मिळाली. तसेच तेथे सूर्यवंशी नावाचे कोणीही अधिकारी नाहीत असे समजल्यावर ही माहिती पाटील यांनी आरटीओ सगरे यांना कळविली.

त्यानंतर आरटीओ सगरे यांच्या सूचनेनुसार पाथर्डी पोलिसांशी संपर्क करत त्या सूर्यवंशी नावाच्या तोतया आरटीओ अधिकाऱ्याला व त्याच्या एका साथीदाराला बनावट नंबर प्लेट लावलेल्या आणि आरटीओ कार्यालयाचा लोगो असलेले स्टीकर चिकटवलेल्या पांढऱ्या रंगाच्या स्कॉर्पिओ गाडी सह ताब्यात घेतले.

या दोघांच्या विरुध्द पाथर्डी पोलिस ठाण्यात फिर्याद देण्यात आली असून या फिर्यादी वरून पोलिसांनी दोघांवर भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २०४ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# हातमाग व वस्त्रोद्योग तंत्रविज्ञान पदविका प्रवेशासाठी १० जूनपर्यंत अर्ज करावेत

नगर - केंद्र सरकारच्या भारतीय हातमाग तंत्रविज्ञान संस्थेत २०२५-२६ या शैक्षणिक सत्रात तीनवर्षीय (सहा सत्रीय) हातमाग व वस्त्रोद्योग तंत्रविज्ञान पदविका अभ्यासक्रमाच्या प्रथम सत्राकरिता महाराष्ट्र राज्यातून बरगढ (ओडिशा) येथे १३ व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांकरिता एक जागा तसेच वेंकटगिरी येथील २ जागांच्या प्रवेशासाठी पात्र उमेदवारांची निवड करण्याकरिता प्रादेशिक उपआयुक्त वस्त्रोद्योग, नागपूर, सोलापूर, मुंबई व छत्रपती संभाजीनगर यांच्यामार्फत विहित नमुन्यात प्रवेश अर्ज १० जूनपर्यंत मागविण्यात आले आहेत.

इच्छुक उमेदवारांनी याबाबत आपले परिपूर्ण अर्ज १० जूनपर्यंत संबंधित प्रादेशिक उपआयुक्त वस्त्रोद्योग कार्यालयाकडे सादर करावे. प्रवेश अर्जाचा नमूना व इतर अनुषंगिक माहिती वस्त्रोद्योग आयुक्तालयाचे संकेतस्थळ http://www.dirtexmah.gov.in वर उपलब्ध आहेत. तसेच अर्जाचा नमूना सर्व प्रादेशिक उपआयुक्त, वस्त्रोद्योग यांचे कार्यालयात देखील उपलब्ध असल्याचे संजय दैने, आयुक्त, वस्त्रोद्योग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी कळविले आहे.

# अहिल्यानगर गौरव दिन अंतर्गत २३ ते ३१ मे दरम्यान 'पालकमंत्री सांस्कृतिक महोत्सवाचे' नगरमध्ये आयोजन

नगर – विचार भारती व जनसेवा फाउंडेशनतर्फे अहिल्यानगर गौरव दिन अंतर्गत 'पालकमंत्री सांस्कृतिक महोत्सवाचे' आयोजन नगरमध्ये २३ ते ३१ मे या दरम्यान करण्यात आले आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंती निमित्त खास या सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यात वक्तृत्व स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, अहिल्यानगर जिल्ह्याच्या मानबिंदुंचे असलेल्या रथांची शोभायात्रा. तसेच स्थानिक कलाकारांचा सांस्कृतिक कार्यक्रम, महिला सबलीकरण विषयावर व्याख्यान व पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या जीवनावरील धगधगती हिंदी नाटिका अशा कार्यक्रमंचे आयोजन करण्यात आले आहे. सावेडीच्या प्रोफेसर कॉलनी चौकाजवळील जॉगिंग ट्रॅकच्या मैदानावर होणाऱ्या या महोत्सवाच्या समारोप समारंभास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधान परिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे, पालकमंत्री राधाकृष्ण विखे, सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे व महिला व बालकल्याण राज्यमंत्री मेघना बोर्डीकर आदी उपस्थित राहणार आहेत. महोत्सवाच्या लोगोचे अनावरण नुकतेच पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्या हस्ते झाले आहे. तसेच या महोत्सवानिमित्त एका खास गौरव गीताचे रचना करण्यात आली असून संगीत दिग्दर्शक डॉ. नीरज करंदीकर व प्रसाद सुवर्णपाठकी हे या गौरव गीताचे संयोजन करत आहेत, अशी माहिती विचार भारतीचे सचिव सुधीर लांडगे यांनी पत्रकार परिषदते दिली. महोत्सवाच्या स्वागताध्यक्षा धनश्री विखे, कार्याध्यक्ष राजेंद्र पाचे, अनिल मोहिते, बाबासाहेब वाकळे, निखील वारे, रवींद्र बारस्कर, मनोज झंवर आदी उपस्थित होते.

धनश्री विखे म्हणल्या, ३१ मे रोजी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीदिनी प्रोफेसर कॉलनी चौकातील जॉगिंग ट्रॅकच्या मैदानावर हिंदुत्ववादी प्रवक्त्या काजल हिंदुस्तानी यांचे 'महिला सबलीकरण काळाची गरज' या व्याख्यानाचे आयोजन सायंकाळी ६.३० ते ८ या वेळेत करण्यात आले आहे. तसेच रात्री ८ वाजता विश्व मांगल्य सभा निर्मित 'राष्ट्र समर्थ देवी अहिल्या की पुण्यगाथा' या हिंदी नाटिकाचे आयोजन करण्यात आले आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवींनी आयुष्यभर केलेल्या संघर्षाची यशोगाथा या नाटिकेतून सदर होणार आहे.



पत्रकार परिषदेत बोलताना पालकमंत्री सांस्कृतिक महोत्सवाच्या स्वागताध्यक्षा धनश्री विखे. यावेळी विचार भारतीचे सचिव सुधीर लांडगे, महोत्सवाचे कार्याध्यक्ष राजेंद्र पाचे व बाबासाहेब वाकळे उपस्थित होते.

रवींद्र बारस्कर म्हणाले, अहिल्यानगरमध्ये २३ मे रोजी राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. न्यू आर्टस् कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयातील सेमिनार हॉलमध्ये सकाळी ११ ते ५ या वेळेत या स्पर्धेची अंतिम फेरी होणार आहे. मराठा विद्या प्रसारक मंडळाचे सहसचिव अॅड. विश्वासराव आठरे यांच्या प्रमुख उपस्थितीत या स्पर्धा होणार आहेत. वक्तृत्व स्पर्धेसाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर एक कुशल प्रशासक, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे धार्मिक कार्य, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला सबलीकरणाचे प्रतीक व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सांस्कृतिक राष्ट्रवादाचे प्रतीक हे विषय देण्यात आहेत. स्पर्धेच्या प्राथमिक फेरीसाठी स्पर्धकांनी दिलेल्या विषयावर भाषण करतानाचे स्वतःचे व्हिडिओ संयोजकांकडे पाठवायचे असून त्याचे परीक्षण होऊन प्राथमिक फेरीतून निवडलेल्या वीस स्पर्धकांची अंतिम फेरीसाठी निवड केली जाणार आहे. या स्पर्धेतील विजेत्यांना प्रथम १० हजार, द्वितीय ७ हजार, तृतीय ५ हजार व उत्तेजनार्थ २००० व १००० रुपयांची रोख बक्षिसे देण्यात येणार आहेत.

तसेच १५ ते २० मे या दरम्यान चित्रकला स्पर्धेचे आयोजन नगर शहरात करण्यात आले आहे. स्पर्धकांना चित्र काढण्यासाठी पेपर आयोजक देणार असून, शहरातील सर्व भागांमधील सेंटरमध्ये स्पर्धकांना हे पेपर उपलब्ध होणार आहेत. या दरम्यान स्पर्धकांनी दिलेल्या विषयावर चित्र काढून ज्या ठिकाणाहून पेपर घेतला आहे त्या सेंटरमध्ये चित्र जमा करावयाचे आहेत. स्पर्धेसाठी गट क्रमांक १ इयत्ता पाचवी ते सातवी विषय आवडते मंदिर, आवडता किल्ला व अहिल्यादेवी यांनी प्रस्थापित केलेले शिवलिंग. गट क्रमांक २ इ.आठवी ते दहावी विषय पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांचे व्यक्तिचित्र, पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांच्या जीवनातील एक प्रसंग व पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांनी नदीकिनारी बांधलेले घाट. गट क्रमांक ३ खुला गट व व्यावसायिक चित्रकार विषय पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांचे व्यक्तिचित्र, पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांनी बांधलेले शिवमंदिर व पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांच्या स्मारकाची तुमची काल्पनिक प्रतिमा हे विषय देण्यात आले आहेत. प्रत्येक गटातून उत्कृष्ट १० बक्षिसांची निवड करण्यात येणार असून बक्षीस तिन्ही गटातील ३० पात्र चित्रकारांना आकर्षक रोख बक्षिसे देण्यात येणार आहेत.

जनसेवा फाउंडेशनचे निखिल वारे म्हणाले, २९ मे रोजी अहिल्यानगर शहरात आकर्षक शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. सायंकाळी ६ वाजता दिल्लीगेट येथून यात्रेस प्रारंभ होणार असून ही यात्रा लालटाकी, प्रेमदान चौक मार्गे जॉगिंग ट्रॅक प्रोफेसर कॉलनी चौक येथे १० वाजता संपेल. डॉ.सुजय विखे हे यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. या यात्रेमध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांच्या जीवनावरील भव्य व आकर्षक चित्ररथांचा तसेच अहिल्यानगर जिल्ह्याच्या मानबिंदुंचे असलेल्या सर्व स्थळांच्या चित्ररथांचा समावेश असणार असून अनेक विविध कलाकारांची उपस्थिती व लोक नृत्यचा समावेश यात असणार आहे. या महोत्सवानिमित्त महिलांसाठी लकी ड्रॉचे आयोजनही करण्यात आले असून भाग्यवान महिला भगिनीस चारचाकी गाडी, दुचाकी गाडी व इतर अनेक आकर्षक बक्षिसे मिळणार आहेत.

३० मे रोजी सायंकाळी ६ ते १० या वेळेत प्रोफेसर कॉलनी चौक येथील जॉगिंग ट्रॅकच्या मैदानावर सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी सिने अभिनेत्री प्राजक्ता माळी, माजी जिल्हा परिषद सदस्या शालिनीताई विखे यांच्या प्रमुख उपस्थितीत होणाऱ्या या सांस्कृतिक महोत्सवात अहिल्यानगरचे स्थानिक कलाकार आपली कला व अहिल्यानगरचा वैभवशाली इतिहास सादर करणारे आहेत.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त ३१ मे रोजी सकाळी चौंडी येथे होणाऱ्या शासकीय कार्यक्रमास सर्वांना उपस्थित राहता यावे यासाठी नगर शहरात सायंकाळी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या पालकमंत्री सांस्कृतिक महोत्सवास राज्याचे सांस्कृतिक मंत्रालय, अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालय व अहिल्यानगर महानगरपालिकेने सहकार्य केले आहे, अशी माहिती बाबासाहेब वाकळे यांनी दिली.

## अहिल्यानगर जिल्हा मराठा नागरी पतसंस्थेला २० लाखांचा ढोबळ नफा; ५० कोटी ठेवीचे उद्दीष्ट पूर्ण

नगर – मराठा सेवा संघ प्रणित, अहिल्यानगर जिल्हा मराठा सेवा नागरी सहकारी पतसंस्थेचे मार्च अखेर ५० कोटी ठेवीची उद्दिष्ट पुर्ण झाले असुन सन २०२४ २०२५ या आर्थिक वर्षात वर्षात २० लाख ढोबळ नफा झाला असल्याची माहिती पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष चेअरमन डॉ. इंजि. विजयकुमार ठुबे यांनी दिली आहे.

मार्च अखेर पतसंस्थेचा एकत्रीत व्यवसाय ८५ कोटी ३९ लाख, खेळते भागभांडवल ५६ कोटी ०३ लाख, स्वनिधी १ कोटी ९० लाख, एकुण ठेवी ५२ कोटी, कर्ज वितरण ३४ कोटी ३९ लाख असुन १९ कोटी १५ लाखाची सुरक्षित गुंतवणुक केलेली आहे.

संस्था समाजातिल होतकरू उद्योजकांना अर्थपुरवठा करून स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी मदत करत आहे. संस्थेने आतापर्यंत अनेक उद्योजकांना मोठ्या प्रमाणात अर्थसाहय केलेले असुन समाजाप्रती असलेली आपली बांधिलकी जपण्याचा प्रयत्न करत आहे.

यावेळी संस्थेचे व्हा. चेअरमन बाळकृष्ण काळे म्हणाले की, पतसंस्थेने रौप्यमहोत्सवी वर्षात पदार्पण केलेले असुन त्यानिमित्ताने रौप्यमोहत्सवी ठेव योजना चालु केलेली असुन सदरच्या ठेव योजनेमध्ये २५१ दिवसाला १० टक्के व्याज व पाच ग्रॅम चांदीचे नाणे देण्यात येणार आहे. तसेच रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्ताने सभासदांनी ५० हजार शेअर्स मध्ये गुंतवणुक केल्यास १५ टक्के लाभांश व ५ ग्रॅम चांदीचे नाणे देण्याचा प्रयत्न करण्यात येईल. संस्थेच्या मार्केट यार्ड, भिंगार, संगमनेर, पाथर्डी, नेवासा, शेवगांव, कर्जत या ठिकाणी शाखा कार्यरत आहेत.

संस्थेच्या विविध योजनेचा लाभ घेण्याचे अवाहन संचालक लक्ष्मणराव सोनाळे, ज्ञानदेव पांडुळे, किशोर मरकड, राजश्री शितोळे, सतिश इंगळे, प्रा. किसन पायमोडे, यशवंत शिंदे, अॅड. काशिनाथ डोंगरे, ज्ञानेश्वर अनभुले, इंजि. संभाजी मते, व्दारकाधिश राजेभोसले, इंजि. बाळासाहेब सोनाळे, प्रा. डॉ. कल्पना ठुबे, अॅड. राजेश कावरे, निवृत्ती रोहोकले, सुनिल जाधव, मुख्य कार्यकारी अधिकारी अशोक वारकड यांनी केले आहे.

## दीपक घारू यांच्या 'झिंजाय या चित्रपटाचा अटकेपार झेंडा

नगर – दिप सिम्फनीज निर्मित, वामन पतके लिखित आणि जेष्ठ नाट्यदिग्दर्शक व अभिनेते दिपक घारू दिग्दर्शित 'झिंजाय या पहिल्याच चित्रपटाचे नवी दिल्ली येथे दादासाहेब फाळके पुरस्कारासाठी स्क्रीनिंग होऊन या चित्रपटासाठी सर्टिफिकेट ऑफ एक्सलन्स हा पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. या चित्रपटाचे बिहारमधील नवाडा येथील नवाडा इंटरनॅशनल फिल्म फेस्टिवल, तामिळनाडू येथील रामेश्वरम इंटरनॅशनल फिल्म फेस्टिवल, कोलकत्ता येथील इंडियन इंडिपेंडेंट फिल्म फेस्टिवल व ब्लू बर्ड फिल्म फेस्टिवल, बाली येथील फोर्थडायमेन्शन इंडिपेंडेंट फिल्म फेस्टिवल, अथेन्स (ग्रीस) येथील अथेन्स इंटरनॅशनल फिल्म फेस्टिवल अशा विविध फेस्टिवल मध्ये झिंजाय ला बेस्टफीचर फिल्म आणि 'बेस्ट डेब्यू डायरेक्शन' हे पुरस्कार पटकावले आहेत. तसेच हरियाणा येथील इंडोग्मा फिल्म फेस्टिवल, जयपूर येथील १० वे जयपूर फिल्म वर्ल्ड, कोलकत्ता येथील बियाँड बॉर्डर इंटरनॅशनल फिल्म फेस्टिवल आणि पुणे येथील आर्यन्स फिल्म अवार्ड्स या सर्व ठिकाणी चित्रपटाचे ऑफिशियल सिलेक्शन झाले आहे. या चित्रपटाची पटकथा, संकलन, असोसिएट दिग्दर्शन अशा विविध जबाबदाऱ्या अर्क यज्ञ (दिप सिम्फनीज) यांनी पार पाडल्या आहेत.



दीपक घारू यांच्या 'झिंजाय या चित्रपटाचा दादासाहेब फाळके पुरस्कारासाठी स्क्रीनिंग होऊन सर्टिफिकेट ऑफ एक्सलन्स हा पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.

चित्रपटक्षेत्राच्या पदार्पणातच दिग्दर्शक दीपक घारू यांनी प्रेक्षकांची मने जिंकली आहेत. दिलावर सिकलकर यांनी उत्कृष्ट सिनेमेटोग्राफी केली आहे व डीओपी नितीन लचके, डी. आय. आर्यन भट यांनी आपली कामगिरी चोख बजावली आहे. कार्यकारी निर्माते दादा ननवरे आणि प्रोडक्शन मॅनेजर आदर्श गोसावी, राधाकृष्ण कराळे यांनी प्रकल्पाची सुरळीत अंमलबजावणी सुनिश्चित केली. अशोक शिंदे, सुधीर देशपांडे हे लाईन प्रोड्यूसर होते. चित्रपटातील गाणी अवंतिका मंडलिक आणि पियुष लोंढे यांनी गायली आहेत. संगीत दिग्दर्शन अर्क यज्ञ यांनी तर संगीत निर्मिती सिद्धेश कुलकर्णी यांनी केली आहे. या चित्रपटातील गाणी गीतकार जयंत लोखंडे यांनी लिहिली आहेत. या चित्रपटात अभिनेते प्रकाश धोत्रे यांनी मुख्य भूमिका साकारली असून सुप्रिया गट, स्वर्गीय सुनील जगधने, रुपेश पसपूल, राधाकृष्ण कराळे, डॉ. सुरेश शिंदे, सुधीर कुलकर्णी, विलास गोसावी, विजयकुमार नेटके, प्रतिमा कुतवळ, विद्या जोशी, श्वेता गमे, सीमा घारू, शौर्य वाळसे, बालकलाकार युगांत कुतवळ, वीर घारू, आर्यन साखरे, अर्णव साखरे आणि दिग्दर्शक दीपक घारू यांच्या महत्त्वपूर्ण भूमिका आहेत. चित्रपटाच्या निर्मितीसाठी अखिल भारतीय चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराज राजे भोसले, निलेश भदाणे, अॅड.ओमप्रकाश सतीजा, विलास गोसावी, डॉ.संतोष पोटे, प्रवीण गायकवाड यांचे सहकार्य लाभले आहे.

## अहिल्यानगर जिल्ह्यात बुद्धिबळ स्पर्धेमुळे जास्तीत जास्त ग्रँडमास्टर तयार होणार

### नरेंद्र फिरोदिया यांचे प्रतिपादन; मोतीलालजी फिरोदिया अखिल भारतीय खुली क्लासिकल बुद्धिबळ स्पर्धेचे बुद्धिबळ पटावर चाल देऊन शुभारंभ

नगर – बुद्धिबळासाठी अहिल्यानगर जिल्हा बुद्धिबळ संघटना कटिबद्ध राहील. आम्ही लौकरच राष्ट्रीय पंच परीक्षा, बीलो १६०० बुद्धिबळ स्पर्धा असे नवनवीन उपक्रम राबविण्याचा मानस उद्घाटनपर भाषणात अ.नगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया यांनी व्यक्त केला. अहिल्यानगर जिल्ह्यात बुद्धिबळ स्पर्धेमुळे जास्तीत जास्त ग्रँडमास्टर तयार होणार असल्याची देखील त्यांनी भावना व्यक्त केली.



अखिल भारतीय मोतीलालजी फिरोदिया खुल्या बुद्धिबळ स्पर्धेचे उद्घाटन नरेंद्र फिरोदिया व आंध्र प्रदेशचा इंटरनॅशनल मास्टर कृष्णा तेजा यांचा हस्ते पटावर चाल देऊन करण्यात आले.

अखिल भारतीय मोतीलालजी फिरोदिया खुल्या बुद्धिबळ स्पर्धेचे उद्घाटन नरेंद्र फिरोदिया व आंध्र प्रदेशचा इंटरनॅशनल मास्टर कृष्णा तेजा यांचा हस्ते पटावर चाल देऊन करण्यात आले.

यावेळी आंध्र प्रदेशचा इंटरनॅशनल मास्टर कृष्णा तेजा यांनी बुद्धिबळ स्पर्धेच्या नियोजनासाठी अहिल्यानगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे आभार व्यक्त केले व दर्जेदार स्पर्धा भरवल्याबद्दल त्यांचे कौतुक केले.

यावेळी सचिव यशवंत बापट, खजिनदार सुबोध ठोंबरे, विश्वस्त श्याम कांबळे, पारुनाथ ढोकळे, प्रकाश गुजराथी, नवनीत कोठारी, दत्ता घाडगे, चेतन कड, किरण सरोदे, अनुराधा बापट, शुभदा ठोंबरे, डॉ. स्मिता वाघ, रोहिणी आडकर, आंतरराष्ट्रीय पंच प्रवीण ठाकरे, पवन राणे, शार्दुल तापसे, देवेंद्र ढोकळे, प्रशांत गंगेकर, विष्णू कुड्रे, स्वप्नील भुंगुरकर, सुनील जोशी, मनीष जसवानी आदी उपस्थित होते.

स्पर्धेचे प्रस्ताविक सचिव यशवंत बापट म्हणाले की, या स्पर्धेत भारतातून बुद्धिबळ खेळाडू खेळण्यासाठी आले आहे. यामध्ये गुजरात, आंध्र प्रदेश, दिव, दमन, गोवा, तमिळनाडू, महाराष्ट्र इत्यादी राज्यातून ३०० च्या वर खेळाडूंनी आपला प्रवेश निश्चित केला. मोतीलालजी फिरोदिया क्लासिक फिडे रेटिंग स्पर्धा शांतीकुमारजी फिरोदिया मेमोरियल फाउंडेशन प्रायोजित केली आहे. नगर जिल्ह्यातील ७५ खेळाडूंनी आपला सहभाग नोंदविला असून या स्पर्धेमध्ये आंतरराष्ट्रीय मानांकन प्राप्त १७१ खेळाडू सहभागी झाले आहेत. वयोवृद्ध व ज्येष्ठ असे २० खेळाडू सहभागी झाले असून या स्पर्धेत फीडे मास्टर वेदांत पानेसर, अरुण कटारिया, कृष्णा तेजा, वीरेश शरणार्थी, विक्रमादित्य कुलकर्णी, राहुल संगमा, श्रीराज भोसले, इंद्रजीत महिंद्रकर, आदित्य बारटक्के, अथर्व सोनी, हर्ष घाडगे, आशिष चौधरी, शार्दुल अय्यप्पा यांच्या सहित अनेक दिग्गज खेळाडू या स्पर्धेत सहभागी झाले आहे. नगर जिल्ह्यात देखील चांगल्या प्रकारे बुद्धिबळाचे खेळाडू घडत आहे. या खेळाडूंना पुढे नेण्याचे कार्य संघटनेच्या मार्फत होत आहे. या स्पर्धेच्या शुभारंभ प्रसंगी जम्मू काश्मीर येथील पहेलगाम येथे झालेल्या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्यांना व माजी आमदार अरुण जगताप यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

स्पर्धेमध्ये उत्कृष्ट खेळाडू व सर्वात ज्येष्ठ खेळाडू व सर्वात लहान वयाचा खेळाडूंचे सत्कार देखील करण्यात आले या स्पर्धेचे सूत्रसंचालन पारुनाथ ढोकळे यांनी केले व आभार सुबोध ठोंबरे यांनी मानले.



६३ व्या राज्यनाट्य स्पर्धेच्या प्राथमिक फेरीत सप्तरंग थिएटर्सला ६ पारितोषिके मिळाली.

## सप्तरंगच्या 'पंचमवेद' व 'तेरा मेरा सपना'ला सहा पारितोषिके

नगर – यावर्षीच्या ६३ व्या राज्यनाट्य स्पर्धेच्या प्राथमिक फेरीचा पारितोषिक वितरण समारंभ नुकताच नाशिक येथे झाला. परशुराम साईखेडकर नाट्यगृह, नाशिक येथे झालेल्या या समारंभात सप्तरंग थिएटर्स, अहिल्यानगर या संस्थेला एकूण ६ पारितोषिके संदीप वसावे (सांस्कृतिक कार्य संचालनालय), अभिनेत्री मीना वाघ आणि नाट्य परिषद नाशिकचे अध्यक्ष सुनील ढगे, नाशिक स्पर्धा समन्वयक राजेश जाधव आणि चंद्रकांत झाडकर यांच्या हस्ते सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आली.

सप्तरंग थिएटर्सच्या 'पंचम वेद' या मराठी नाटकासाठी नाट्य निर्मिती द्वितीय क्रमांक, डॉ. श्याम शिंदे यांना दिग्दर्शन द्वितीय क्रमांक तसेच याच संस्थेच्या 'तेरा मेरा सपना' या बालनाट्यासाठी नाट्य निर्मिती द्वितीय क्रमांक, कल्पेश शिंदे यांना दिग्दर्शन द्वितीय क्रमांक, गायत्री रोहोकले हिला स्त्री अभिनयाचे रौप्यपदक तर साईराज सरडे यास अभिनयाचे प्रमाणपत्र मिळाले. सप्तरंग थिएटर्स ही संस्था ३९ वर्ष सातत्याने कार्यरत असलेली संस्था आहे. महाराष्ट्र शासनाच्या राज्य नाट्य स्पर्धेत सलग ३६ वर्ष सहभाग घेत आहे. संस्थेला आतापर्यंत राज्यनाट्य स्पर्धेची तब्बल १९६ पारितोषिके प्राप्त आहेत. संस्थेच्या माध्यमातून अहिल्यानगर जिल्ह्यातील एक हजार पेक्षा जास्त कलावंतांना विनाशुल्क नाटयशिक्षण देण्यात आले आहे.

## पद्मकन्या कु. अनुषा आडेप हिचा 'माझी प्रार्थना' हा चित्रपट ९ मे रोजी प्रदर्शित

### सौ.स्वाती सिरसुल यांची माहिती; पद्मशालीसह इतर समाज बांधवांनी हा चित्रपट आवश्य पहावा

नगर – मुंबई फिल्म इंडस्ट्री मधील स्टुडिओ संचालक उद्योजक शिवा ताटीकोंडा व मुंबई आंध्र महासभा व जिमखाना संस्थेचे सचिव असलेले वेंकटेश गाजेंगी व त्यांच्या मित्र परिवारांच्या सहकार्याने सध्या ठाणेस्थित असलेले वेनू आडेप यांची कन्या कु. अनुषा आडेप हीने सिनेसृष्टीत प्रवेश केला असून तिची प्रमुख भूमिका असलेली 'माझी प्रार्थना' हा मराठी चित्रपट महाराष्ट्र राज्यात ९ मे रोजी प्रदर्शित होत असल्याची माहिती अहिल्यानगर येथील पद्मशाली समाज महिला मंडळाच्या अध्यक्षा सौ. स्वाती सिरसुल यांनी माहिती दिली आहे.

सर्वांचे आकर्षण असलेले व जीवघेण्या संघर्ष असलेल्या या फिल्म इंडस्ट्री क्षेत्रात प्रवेश मिळणे तसे अत्यंत कठीण, मात्र अभिनयाच्या जोरावर कु. अनुषा आडेप ही पद्मशाली समाजातील कन्या प्रथमच मुख्य भूमिकेत रोल करत असून ही बाब कौतुकास्पद असल्याचे मत पुणे पद्मशाली प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजय रच्चेवार यांनी व्यक्त केले.

दक्षिण भारतीय सिनेसृष्टीतील गायिका पद्मश्री के. एस. चित्राजी यांनी या नवोदित अभिनेत्रीच्या अभिनयाबाबत प्रशंसा केली असून या चित्रपटात त्यांनी तीन गाणी गायली आहेत. हा चित्रपट ग्रामीण जीवनावर आधारित (अकल्पनीय प्रेम कथा) असून निसर्गाने नटलेले दृश्य आणि सुंदर पार्श्वसंगीत आहे.

हा चित्रपट ९ मे रोजी रोजी संपुर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार असून प्रत्येक पद्मशाली समाजातील तरुण-तरुणींसह महिला, वृद्ध व सर्व कुटुंबियांसोबत व अहिल्यानगरवासीय आणि अन्य मराठी भाषिक बांधवांनी थिएटरमध्ये जाऊन एकदा तरी हा चित्रपट पाहावा अशी आग्रहाची विनंती पद्मशाली समाज महिला मंडळाच्या अध्यक्षा सौ. स्वाती सिरसुल यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

## भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलमधील बारावी बोर्डाच्या गुणवंतांचा सन्मान

नगर – महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा फेब्रुवारी-मार्च २०२५ मध्ये झालेल्या बारावी बोर्डाच्या (एचएससी) परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून, अहमदनगर एज्युकेशन सोसायटीचे भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजचा सायन्स व कॉमर्स दोन्ही विभागांचा शंभर टक्के निकाल लागला आहे. या दोन्ही विभागात पहिल्या पाच क्रमांकाने शाळेच्या गुणवत्ता यादीत चमकलेल्या विद्यार्थ्यांचा संस्थेच्यावतीने गौरव करण्यात आला.



अहमदनगर एज्युकेशन सोसायटीचे भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजचा सायन्स व कॉमर्स दोन्ही विभागांचा शंभर टक्के निकाल लागला आहे.

विद्यार्थ्यांच्या गुणगौरव समारंभासाठी संस्थेचे उपाध्यक्ष अशोक मुथा, खजिनदार प्रकाश गांधी, सल्लागार समितीचे सदस्य भूषण भंडारी, विद्यालयाचे प्राचार्य उल्हास दुगड, उपमुख्याध्यापक पोपट पवार, पर्यवेक्षक बाळू वाव्हळ, विष्णु गिरी, कैलास साबळे आदींसह गुणवंत विद्यार्थी, शिक्षक व पालक उपस्थित होते.

वैष्णवी प्रशांत मेहेत्रे हिने ९१.५० टक्के गुण मिळवून सायन्स विभागात विद्यालयात प्रथम क्रमांक मिळवला आहे. तर आर्यन कैलास बोरा याने ९५.६७ टक्के गुण मिळवून कॉमर्स विभागात प्रथम क्रमांक मिळवला आहे. संस्थेचे अध्यक्ष अभय फिरोदिया, प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया, सहकार्यवाहक गौरव फिरोदिया यांनी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करुन पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

**एचएससी शास्त्र विभाग** :- प्रथम- वैष्णवी प्रशांत मेहेत्रे हिने ९१.५० टक्के गुण (इंग्रजीत ९१ गुण), द्वितीय- यशस्वी रवी साखला ८८.८३ टक्के (डीजी व जीएस विषयात २०० पैकी १९९ गुण), तृतीय- भूषण तखतमल गुगळे ८३.३३ (मराठीत ९३ गुण), चौथी- प्राजक्ता विलास शिंदे ८०.८३ टक्के (भौतिक शास्त्र ८३ व रसायनशास्त्र ९२ गुण), पाचवी- वैभवी नितीन रसाळ ७९.५० टक्के (समाजशास्त्र ९१ गुण).

**एचएससी कॉमर्स विभाग** :- प्रथमः- आर्यन कैलास बोरा याने ९५.६७ टक्के (अकौटन्सी, मॅथ्स व आयटीत १०० पैकी १०० गुण), द्वितीय- आकांक्षा सचिन कटारिया ९३.८३ टक्के (इंग्रजीत ९२ गुण), तृतीय- श्लोक सचिन बोरा ९३.३३ टक्के, चौथा- प्रेम आनंद कोठारी ९२.८३ टक्के, दिया जतिन मेहेता ९१.६७ टक्के (अर्थशास्त्र ९७ गुण) पार्थ मंगेश चंगेडिया, स्मित संतोष गुगळे या विद्यार्थ्यांनी बुक कीपिंग अॅण्ड अकाउंटन्सी या विषयात १०० पैकी १०० गुण मिळवले आहेत.

# श्री रामकृष्ण अर्बन सहकारी क्रेडिट सोसायटीच्या अध्यक्षपदी किसनलाल बंग तर उपाध्यक्षपदी राजेंद्र मालू यांची निवड


श्रीगोपाल धूत


किसनलाल बंग


राजेंद्र मालू

नगर – श्री रामकृष्ण अर्बन क्रेडिट सोसायटीच्या संचालक मंडळाची निवडणूक नुकतीच झाली. यात सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष श्रीगोपाल धूत प्रणित सद्भावना पॅनलने सर्वच्या सर्व जागांवर विजयी मिळवल्यानंतर संचालक मंडळाची पहिली सभा संस्थेच्या मुख्य कार्यालयात तालुका उपनिबंधक सहकारी संस्था अधिकारी शुभांगी गोंड यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या सभेत संस्थेच्या अध्यक्षपदासाठी किसनलाल बंग यांची तसेच उपाध्यक्षपदी राजेंद्र मालू यांची एकमताने बिनविरोध निवड करण्यात आली.

अध्यक्षपदासाठी बंग यांच्या नावाची सुचना श्रीगोपाल धूत यांनी केली. संचालक प्रकाश गांधी यांनी त्यास अनुमोदन दिले. उपाध्यक्षपदासाठी मालू यांच्या नावाची सुचना संचालक ओमप्रकाश चांडक यांनी केली. संचालक लक्ष्मीकांत झंवर यांनी अनुमोदन दिले.

सभेच्या अध्यक्षा शुभांगी गोंड आणि सहकार अधिकारी संजय बनसोडे यांचा संस्थेतर्फे श्रीगोपाल धूत यांनी सत्कार केला. लक्ष्मीकांत झंवर यांनी प्रास्ताविक करताना श्रीगोपाल धूत यांच्या नेतृत्वाखाली सद्भावना पॅनलने मिळविलेल्या यशानंतर अध्यक्ष व उपाध्यक्ष निवडीसाठीची ही सभा होत असल्याची माहिती दिली.

नूतन अध्यक्ष किसनलाल बंग यांनी संस्थेची आदर्श कारभाराची परंपरा आहे. आजवरच्या संचालकांनी अतिशय चांगले काम करून संस्थेची घौडदौड कायम राखली. सभासदांचा विश्वास आणि सर्व संचालक मंडळाची एकदिलाने विश्वस्त भावनेने काम करण्याची पद्धत हेच संस्थेचे मुख्य वैशिष्ट्य आहे. श्रीगोपाल धूत यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेच्या प्रगतीत योगदान देवू, असे सांगितले.

नूतन उपाध्यक्ष राजेंद्र मालू यांनीही संस्थेची प्रगती हे लक्ष्य समोर ठेवून कार्यरत राहू, अशी ग्वाही दिली.

याप्रसंगी संचालक अनुराग धूत, लक्ष्मीकांत झंवर, प्रकाश गांधी, राजेंद्र गुजराथी, गोपाल मणियार, ॲड.अशोक बंग, ओमप्रकाश चांडक, राजेंद्रकुमार कंत्रोड, राजकमल मणियार, शोभा राठी, अनुरिता झगडे, साईनाथ कावट, देवराव साठे या संचालकांसह व्यवस्थापक शशिकांत पुंडलिक व कार्यासन अधिकारी कुमार आपटे उपस्थित होते.

उपाध्यक्ष राजेंद्र मालू यांनी आभार मानले.

# योगतज्ज्ञ दादाजी वैशंपायन पुरस्कारांचा १२ मे रोजी शेवगाव येथे वितरण सोहळा


शरद प्रतापे महाराज


प्रा. मुकुंदराव आंधळे

नगर – योगतज्ज्ञ दादाजी वैशंपायन यांच्या १०६ व्या जयंतीचे औचित्य साधून त्यांच्याच नावे अध्यात्मिक व सामाजिक पुरस्कार १२ मे रोजी सायंकाळी ४ वाजता शेवगाव येथे प्रदान केले जाणार आहेत, अशी माहिती गुरूदत्त सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि कला व क्रीडा संस्थेचे अध्यक्ष अर्जुनतात्या फडके यांनी दिली.

ते म्हणाले, नाशिक येथील श्री गजानन कस्तुरे काका यांच्या अध्यक्षतेखाली होणारे या सोहळ्यात श्री प्रतापे काका महाराज (श्रीदत्त मंदिर भालोद, गुजरात) प्रा. मुकुंदनाथ आंधळे (संस्थापक जगदंबा ट्रस्ट, देऊळगांव राजा) यांना अध्यात्मिक पुरस्कार श्री स्वामी कृष्णचैतन्यजी यांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे. प्रभू श्रीरामचंद्र यांचे गुरू महर्षी वसिष्ठ यांनी स्थापन केलेल्या किमया आश्रमाचे (मुळशी, पुणे) १३३७ वे पिठाधीश, महायोगी एवमं भारतीय वैज्ञानिक, प्रबुध्द श्री स्वामी कृष्णचैतन्यजी आहेत.

सामाजिक कार्य गौरव पुरस्कार डॉ.गौतम काळे, डॉ. दिनेश झिरपे आणि डॉ.अभिजित बाहेती यांना आ.मोनिकाताई राजळे व मा.आ.चंद्रशेखर घुले पाटील यांच्या हस्ते दिला जाणार आहे.

या सोहळ्यास शरद वैशंपायन, अनुदिप दिघे, उदय देशपांडे (नाशिक), उद्योगपती गिरीश साठे (मुंबई), प्राचार्य डॉ.महेंद्र गौशाल (बीड), रविंद्र पुसाळकर (मुंबई) आदी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित रहाणार आहेत.

या सोहळ्यास उपस्थित रहावे, असे आवाहन संस्थेचे सचिव फुलचंद रोकडे यांनी केले आहे.

# ग्रामीण मराठी साहित्य संमेलनाच्या स्वागत अध्यक्षपदी खासदार निलेश लंके यांची निवड

नगर – निमगाव वाघा (ता. नगर) येथे छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त १४ मे रोजी होणाऱ्या राज्यस्तरीय ग्रामीण मराठी साहित्य संमेलनाच्या स्वागत अध्यक्षपदी खासदार निलेश लंके यांची निवड करण्यात आली आहे. संमेलनाचे संयोजक पै. नाना डोंगरे यांनी खासदार लंके यांना स्वागत अध्यक्षपदाच्या जबाबदारीचे पत्र दिले.


ग्रामीण मराठी साहित्य संमेलनाच्या स्वागत अध्यक्षपदी खासदार निलेश लंके यांची निवड करण्यात आली.

स्व. पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ आणि धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने पहिले ग्रामीण मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले असून, राज्यभरातील ज्येष्ठ साहित्यिक व कवी या सोहळ्यास उपस्थित राहणार आहे. छत्रपती संभाजी महाराज हे स्वयं उत्कृष्ट साहित्यिक होते. त्यांनी विविध भाषांचे सखोल अध्ययन केले होते तसेच अभ्यासपूर्ण ग्रंथनिर्मितीही केली होती. त्यांच्या कार्यातून नवोदित साहित्यिकांना प्रेरणा मिळावी, या उद्देशाने या ग्रामीण साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती पै. नाना डोंगरे यांनी दिली.

सर्वसामान्यांचे व शेतकरी वर्गाचे संसदेत प्रश्न मांडून ते सोडविण्यासाठी सातत्याने पुढाकार घेणारे खासदार लंके यांना या संमेलनात उत्कृष्ट संसदपटू पुरस्काराने सन्मानित केले जाणार आहे. संमेलनाच्या उद्घाटनाप्रसंगी गावातून छत्रपती संभाजी महाराजांच्या साहित्यावर आधारित ग्रंथ दिंडी काढली जाणार आहे. यानंतर परिवार मंगल कार्यालयात मान्यवरांच्या हस्ते संमेलनाचे औपचारिक उद्घाटन होणार आहे.

यावेळी ज्येष्ठ साहित्यिक व विचारवंत यांचे परिसंवाद आणि व्याख्याने होणार आहेत. मध्य सत्रात कवी संमेलन रंगणार असून, वाचन संस्कृती वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच विविध क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्यांना पुरस्कार देवून सन्मानित केले जाणार आहे.


चंद्रकांत उर्फ काका शेळके यांची ओबीसी व्ही.जे.एन.टी. शिवसेना सेल अहिल्यानगर दक्षिण जिल्ह्याच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली. या निवडीचे पत्र प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब किसवे यांच्या हस्ते शिर्डी येथे झालेल्या मेळाव्यामध्ये देण्यात आले. (छाया – प्रसाद शिंदे)

# शिवसेना ओबीसी व्हीजेएनटी अहिल्यानगर दक्षिण जिल्हाध्यक्षपदी चंद्रकांत उर्फ काका शेळके यांची निवड

नगर – ओबीसी व्हि.जे.एन.टी.शिवसेना अहिल्यानगर दक्षिण जिल्हाध्यक्षपदी चंद्रकांत उर्फ काका शेळके यांची निवड पक्षाचे प्रमुख व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशाने व शिवसेना सचिव संजय मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पारनेर, श्रीगोंदा, कर्जत, जामखेड, अहिल्यानगर शहर या कार्यक्षेत्रासाठी ओबीसी व्ही. जे. एन. टी. अध्यक्ष पदाची जबाबदारी देण्यात आली आहे.

या निवडीचे पत्र प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब किसवे यांच्या हस्ते शिर्डी येथे झालेल्या मेळाव्यात देण्यात आले. यावेळी कार्यक्रमास प्रदेशाध्यक्ष महिला मराठवाडा प्रमुख मुंडेताई, माजी आमदार भाऊसाहेब कांबळे, उत्तर जिल्हा प्रमुख प्रदीपराज भोंडे व सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

चंद्रकांत शेळके हे गेली दहा ते पंधरा वर्षापासून अहिल्यानगर शहरामध्ये सामाजिक कामामध्ये अग्रेसर असून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता मदत कक्षाच्या माध्यमातून शहरासह जिल्ह्यातील अनेक रुग्णांना मदत मिळवून दिली आहे. सामाजिक कार्यामध्ये अग्रेसर असल्याकारणाने पक्षाच्या वतीने त्यांची या पदी निवड करण्यात आली असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

# जिल्ह्यातील कोणत्याही नोंदणी कार्यालयात मिळकतींची दस्तनोंदणी

नगर – शासनाच्या 'वन स्टेट वन रजिस्ट्रेशन' उपक्रमामुळे नागरिकांना कुठल्याही तालुक्यातील मिळकतीची दस्तनोंदणी जिल्ह्यातील कुठल्याही नोंदणी कार्यालयात करता येणार आहे, अशी माहिती सहजिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी महेंद्र एस. महाबरे यांनी दिली आहे.

शासनाने १०० दिवसांच्या कृती कार्यक्रमात 'वन स्टेट वन रजिस्ट्रेशन' करण्याचे जाहीर केले होते. त्यानुसार नोंदणी महानिरीक्षक रवींद्र बिनवडे यांनी युद्ध पातळीवर यंत्रणा राबवून एक जिल्हा एक नोंदणी हा उपक्रम १ मे पासून सुरु केला आहे. त्यामुळे आता एका जिल्ह्यातील समाविष्ट सर्व तालुक्यातील कुठल्याही गावाचे, मौजेचा दस्त जिल्ह्यातील कुठल्याही नोंदणी कार्यालयात नोंदविता येणार आहेत. हा उपक्रम यशस्वी झाल्यावर पुढील काळात 'वन स्टेट वन रजिस्ट्रेशन' यावर अंमलबजावणी होणार असून यामुळे जनतेची कामे सुलभरित्या होण्यास मदत होणार आहे.

एक जिल्हा, एक नोंदणीसाठी शासनाने जिल्ह्यातील सर्व नोंदणी अधिकारी यांचे पदनाम सह दुय्यम निबंधक असे केले आहे. जिल्ह्यातील सर्व नोंदणी अधिकारी यांचे कार्यक्षेत्र हे संपूर्ण जिल्हा करण्यात आले असून तशा सुधारणा करण्यात आल्या आहेत.

यापूर्वी प्रत्येक तालुक्यातील नोंदणी कार्यालयात नोंदविणे बंधनकारक होते. एक जिल्हा एक नोंदणी अंतर्गत जिल्ह्यातील कुठल्याही तालुक्यातील मिळकतीचा दस्त हा जिल्ह्यातील कुठल्याही अन्य तालुक्यातील नोंदणी कार्यालयात नोंदविता येणार आहे.

एक जिल्हा, एक नोंदणी ही 'वन स्टेट वन रजिस्ट्रेशनची' पहिली पायरी असून जिल्ह्यातील कुठल्याही तालुक्यातील मिळकतीच्या दस्ताची नोंदणी जनतेला जिल्ह्यातील सोयीच्या कुठल्याही तालुक्यात करता येणार आहे. सूची क्रमांक २ वर गावाचे नाव, तालुका व जिल्हा नमूद असणार असल्याने शोध घेणेही सुलभ होणार असल्याचेही कळविण्यात आले आहे.

# महाराष्ट्र फुटबॉल संघासाठी जॉय शेळके याची निवड

**ओम दंडवते व अरमान शेख यांची महाराष्ट्र राज्य बीच फुटबॉल संघ प्रशिक्षणासाठी रवाना**



नगर – नारायणपूर, छत्तीसगढ येथे १२ ते २७ मे दरम्यान होणाऱ्या २० वर्षाखालील स्वामी विवेकानंद राष्ट्रीय फुटबॉल स्पर्धेसाठी महाराष्ट्र राज्याच्या फुटबॉल संघात अहिल्यानगर जिल्हा फुटबॉल संघटनेचा खेळाडू जॉय पंकज शेळके यांची निवड झाली आहे.

एप्रिल महिन्यात पार पडलेल्या महाराष्ट्र राज्य फुटबॉल अजिंक्य स्पर्धेमधून राज्यभरातील ४४ खेळाडूंची वेस्ट इंडिया फुटबॉल असोसिएशनद्वारे निवड करण्यात आली होती. या निवडक खेळाडूंची अंतिम निवड चाचणी व प्रशिक्षण २५ एप्रिल ते ५ मे दरम्यान मुंबई येथे पार पडले.

या शिबिरातील १८ खेळाडूंची महाराष्ट्र संघासाठी निवड करण्यात आली आहे. जय शेळके अहमदनगर जिल्हा फुटबॉल असोसिएशनद्वारे आयोजित केलेला जिल्हा फुटबॉल लीग मध्ये फिरोदिया शिवाजीयन्स फुटबॉल क्लबचे प्रतिनिधित्व केले आहे. तसेच वरिष्ठ राज्य अजिंक्यपद फुटबॉल स्पर्धेमध्ये अहिल्यानगर जिल्हा संघाचे प्रतिनिधित्व केले आहे.

अलिबाग जिल्हा रायगड येथे ७ मे पासून पार पाडणाऱ्या महाराष्ट्र राज्य बीच फुटबॉल संघ प्रशिक्षण शिबिर निवड चाचणीसाठी ओम साहेबराव दंडवते (कराळे क्लब हाऊस) व अरमान इकबाल शेख (गुलमोहर स्पोर्ट्स क्लब) यांची देखील निवड झाली आहे. दोन्ही खेळाडू स्पर्धेसाठी रवाना झाले आहेत. या निवड चाचणीसाठी दोघेही खेळाडू खेलो इंडिया बीच गेम २०२५ मध्ये महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणार आहे.

सर्व यशस्वी खेळाडूंचे जिल्हा संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया, वरिष्ठ उपाध्यक्ष मनोज वाळवेकर, उपाध्यक्ष खालीद सय्यद, अमरजीत सिंग शाही, जोगासिंग मिन्हास, सचिव रोनप फर्नांडिस, सहसचिव प्रदीप जाधव, राजू पाटोळे, विक्टर जोसेफ, खजिनदार रिशपालसिंग परमार यांनी अभिनंदन करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# पी. ए. इनामदार इंग्लिश मीडियम स्कूल ॲण्ड ज्युनियर कॉलेजचा बारावीचा ९८ टक्के निकाल


मिर्झा मदीहा तन्वीर शेख जेबा नासीर मिर्झा जफीरा अतीक

नगर – इकरा एज्युकेशन ॲण्ड वेल्फेअर सोसायटीच्या गोविंदपुरा येथील पी. ए. इनामदार इंग्लिश मीडियम स्कूल ॲण्ड ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी यावर्षीही यशाची परंपरा कायम ठेवली. नुकत्याच लागलेल्या बारावी बोर्डाच्या मार्च २०२५ च्या परीक्षेत कॉलेजचा निकाल ९८ टक्के लागला.

यामध्ये कॉलेजची विद्यार्थिनी मिर्झा मदीहा तनवीर याने ७५.८५% गुण प्राप्त करून प्रथम क्रमांक मिळवला. तर द्वितीय शेख जेबा नासिर ६९.३३, तृतीय मिर्झा जफिरा अतीक ६५ टक्के गुण प्राप्त केले.

या यशाबद्दल कॉलेजचे प्राचार्य फिरोसअली मराक्कटील, उपप्राचार्या फरहाना शेख तसेच संस्थेचे चेअरमन अब्दुल रहीम खोकर, व्हा. चेअरमन इंजि. इकबाल सय्यद, सचिव विकार काझी, खजिनदार डॉ. खालीद शेख, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून कौतुक केले.


छत्रपती शिवाजीराजे ग्रामपंचायत अधिकारी सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी सदानंद डोखे तर व्हा.चेअरमनपदी नवनाथ गोरे व मानद सचिवपदी श्रीमती अर्चना गुंड यांची निवड करण्यात आली. यावेळी सर्व संचालकांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

# अहमदनगर महाविद्यालयातील एफवायबीसीएच्या विद्यार्थ्यांचे यश


अहमदनगर महाविद्यालयातील एफ.वाय.बी.सी.ए. विभागातील विद्यार्थ्यांनी परीक्षेत उत्तुंग भरारी मारली.

नगर – अहमदनगर महाविद्यालयाच्या एफ.वाय.बी.सी.ए. विभागाचे नुकतीच निकाल हाती आला आहे. या परीक्षेत विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये तनवी बोरा हिने ९६.४ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. मृदुला देशमुख हिने ९४.४ टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक तर नेवील चक्रनारायण याने ९२.७ टक्के गुणांसह तृतीय क्रमांक प्राप्त केला.

यशस्वी विद्यार्थ्यांचा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.नोएल पारगे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी डॉ. सय्यद रज्जाक यांच्यासह प्राध्यापक उपस्थित होते.

यावेळी प्राचार्य डॉ.नोएल पारगे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी मेहनत, शिस्त आणि चिकाटीच्या जोरावर हे घवघवीत यश मिळवले आहे. हे आमच्या शिक्षणपद्धतीसाठी आणि संपूर्ण संस्थेसाठी गौरवाचे क्षण आहेत. विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या नवनवीन शिक्षण पद्धतींचा आढावा घेतला. त्यांनी सांगितले की, महाविद्यालयात केवळ पाठ्यपुस्तकापुरते शिक्षण न राहता प्रात्यक्षिक शिक्षण, संगणकीय प्रयोगशाळा, प्रोजेक्ट आधारित अध्यापन व वैयक्तिक मार्गदर्शनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधला जातो. विद्यार्थ्यांसाठी आवश्यक त्या प्रत्येक गोष्टीची उपलब्धता महाविद्यालय पुरवते, यामुळेच असे यश शक्य होते.

यशस्वी विद्यार्थ्यांचे बी. पी. एच. हिवाळे संस्थेचे अध्यक्ष डॉ. आर. जे. बार्नबस यांनी कौतुक करून पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# छत्रपती शिवाजीराजे ग्रामपंचायत अधिकारी सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी सदानंद डोखे तर व्हाईस चेअरमनपदी नवनाथ गोरे

नगर – अहिल्यानगर येथील छत्रपती शिवाजीराजे ग्रामपंचायत अधिकारी सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी सदानंद डोखे तर व्हा.चेअरमनपदी नवनाथ गोरे यांची निवड एकमताने निवड करण्यात आली. तर मानद सचिवपदी श्रीमती अर्चना गुंड यांची निवड करण्यात आली. पतसंस्थेच्या चेअरमन, व्हा. चेअरमनपदाच्या निवडीसाठी नगर तालुका उपनिबंधक श्रीमती शुभांगी गौंड व सहाय्यक एस. यु. बनसोडे यांच्या मार्गदर्शनाखाली संचालक मंडळाची सभा आयोजीत करण्यात आली होती. या सभेत चेअरमनपदी सदानंद डोखे व व्हा.चेअरमन नवनाथ गोरे तसेच मानद सचिवपदी श्रीमती अर्चना गुंड यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

यावेळी ज्ञानेश्वर सुर्वे, दिलीप वारकड, संतोष थिगळे, श्रीकांत साळे, राजेश तगरे, संतोष साबळे, गोटीराम मडके, रवि देशमुख, प्रशांत सातपुते, प्रताप साबळे, हरिष भालेराव, ज्ञानदेव अडसुरे, श्रीमती सुरेखा लांडगे, किशोर जेजुरकर, संतोष खंडागळे आदी संचालक उपस्थित होते.

प्रास्ताविक व सुत्रसंचालन संचालक किशोर जेजुरकर यांनी केले.

# त्र्यंबकराव उर्फ बाळासाहेब देशमुख यांना जीवन गौरव पुरस्कार

**फलटण येथे १६ मे रोजी तेराव्या अखिल भारतीय साहित्य संमेलनात होणार गौरव**



नगर – मराठी साहित्य मंडळ (मुंबई) यांच्या वतीने अहिल्यानगर शहरातील साहित्यिक त्र्यंबकराव उर्फ बाळासाहेब देशमुख यांना राज्यस्तरीय सावित्रीबाई फुले जीवन गौरव साहित्य भूषण पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

फलटण येथे १६ मे रोजी होणाऱ्या तेराव्या अखिल भारतीय साहित्य संमेलनात उपस्थितांच्या हस्ते देशमुख यांना पुरस्कार प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. जयप्रकाश घुमटकर उर्फ कवी गोलघुमट यांनी दिली.

बाळासाहेब देशमुख हे अहिल्यानगर जिल्ह्याचे मराठी साहित्य मंडळाचे अध्यक्ष आहेत. त्यांची आतापर्यंत श्रीक्षेत्र मांडवगण आणि सिद्धेश्वर दर्शन, आबा मास्तर, माऊंटन मॅन, संत आईसाहेब महाराज देशमुख आणि संत पळसेकर महाराज ही धार्मिक व सामाजिक विषयांवरील पुस्तके प्रसिद्ध झालेली आहेत.






# शिक्षकांच्या मागण्या मान्य कराव्यात अन्यथा राज्यव्यापी शाळा बंद आंदोलन

## ८ ऑगस्ट २०१५ चा संचमान्यतेचा शासन निर्णय रद्द करून पूर्वीप्रमाणे संच मान्यता द्यावी : मुख्याध्यापक संघाचे राज्य उपाध्यक्ष व जिल्हाध्यक्ष सुनिल पंडित



नगर – २८ ऑगस्ट २०१५ चा संचमान्यतेचा शासन निर्णय रद्द करून पूर्वीप्रमाणे संच मान्यता देण्यात यावी. या व इतर अनेक मागण्यासाठी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघाच्यावतीने चौंडी येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, शिक्षणमंत्री दादा भुसे यांना निवेदन देण्यात आल्याची माहिती मुख्याध्यापक संघाचे राज्य उपाध्यक्ष व जिल्हाध्यक्ष सुनिल पंडित यांनी दिली.

या निवेदन म्हटले की, १५ मार्च २०२४ या शासन निर्णयाच्या अटींमुळे ग्रामीण भागातील बहुतांश छोट्या शाळांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. शासन निर्णय २८ ऑगस्ट २०१५ मध्ये दुरुस्ती करून शासन निर्णय ८ जानेवारी २०१६ नुसार इयत्ता नववी–दहावी या वर्गासाठी किमान ३ पदे मंजूर होती. त्यामुळे ग्रामीण भागातील छोट्या शाळांमध्ये किमान तीन शिक्षक उपलब्ध होत होते. परंतु शासन निर्णय १५ मार्च २०२४ मधील मुद्दा क्रमांक ३ मधील निकषानुसार इयत्ता नववी मध्ये २० विद्यार्थी तसेच इयत्ता दहावी मध्ये २० विद्यार्थी असणे आवश्यक आहेत तरच शिक्षक पद मंजूर होणार आहे. अन्यथा इयत्ता नववी– दहावी गटासाठी कोणतेही शिक्षक पद मंजूर होणार नाही. बहुतांश ग्रामीण भागातील माध्यमिक शाळांमध्ये इयत्ता नववी भाग दहावी मध्ये विद्यार्थी संख्या ४० पेक्षा कमी आहे. अशा सर्व शाळामध्ये एकही पद मंजूर न झाल्याने संस्थाचालकांवर शाळा बंद करण्याची वेळ आलेली आहे. तसेच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसमोर माध्यमिक शिक्षणाचा बिकट प्रश्न निर्माण होणार आहे.

उदा. १ काही ग्रामीण भागात ४०/४२ विद्यार्थी आहेत परंतु इयत्ता ९ वी मध्ये १८ विद्यार्थी व इयत्ता १० मध्ये २३ विद्यार्थी म्हणजेच एकूण ४० पेक्षा पट असूनही शाळेला GST-(९ –१०) गटासाठी एकही शिक्षक मंजूर नाही. म्हणजे अशी शाळा आपोआपच बंद होणार. GST-(९ –१०) किमान विज्ञान/ गणित, समाजशास्त्र, भाषा /इंग्रजी असे किमान तीन शिक्षक नसतील ग्रामीण भागातील विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहतील. उदा. २ काही गावातील शाळेमध्ये २० ते ३० विद्यार्थी आहेत जर ती शाळा नव्या निकषानुसार बंद होत असेल तर त्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय काय ? ग्रामीण भागात सार्वजनिक वाहतूक व्यवस्था पुरती डबघाईला आली आहे ? पालकांना याचा आर्थिक फटका बसेलच. शिवाय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वेळ वाया जाईलच. शिवाय विद्यार्थ्यांना शारीरिक त्रास होणार तो वेगळाच? सुरक्षेचा प्रश्न अनुत्तरीतच राहणार ? उदा. ३ गावातील छोट्या शाळातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा शासन निर्णयामध्ये कोणतीच तरतूद दिसून येत नाही कारण या छोट्या शाळातील विद्यार्थ्याच्या साठी कला, क्रीडा या साठी शिक्षक नकोत का ? याचे उत्तर शासनाकडे नाही हीच चिंतेची बाब आहे. उदा. ३ मोठ्या शाळांमध्ये कला /क्रीडा शिक्षक मंजूर केले. परतू सदर शिक्षक पदे स्वतंत्रपणे मंजूर नसून. एकूण मंजूर पदांमधून फक्त स्वतंत्र दाखवली आहे. म्हणजेच कला/क्रीडा/कार्यानुभव यासाठी शिक्षक पदे मंजूर केल्याचा आभास निर्माण केला.

छोट्या शाळा बंद झाल्याने हजारो शिक्षक अतिरिक्त ठरणार आहे त्या अतिरिक्त शिक्षकांचा समायोजनाचा प्रश्न बिकट होणार आहे. याचा परिणाम पवित्र प्रणालीतील शिक्षक भरतीवर होणार आहे. जवळपास शिक्षक भरती रद्द करावी लागणार अशी चिन्हे आहेत. शासन निर्णयातील जाचक व ग्रामीण भागाचा अभ्यास न केल्याने तसेच वरिष्ठ कार्यालयातील उच्चपदस्थ अधिकारी यांच्या अभ्याशून्यते मुळे या शासन निर्णयांमध्ये शासनाची नामुष्की येईल अशा प्रकारचे नियम घातले गेले किंबहुना तशा निर्णय समिती तसेच मंत्रिमंडळ यांच्यासमोर ठेवली गेल्यामुळे त्याचा शिक्षण क्षेत्राला त्रास होत आहे. शासनाने याचा सखोल ग्रामीण व शहरी भाग असा स्वतंत्र विचार करून विद्यार्थ्या शिक्षणाच्या दृष्टीने व भविष्यकाळातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी कायद्यामध्ये लवचिकता आणून सुधारित निकषांचा विचार करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. छोट्या शाळांमध्ये कोणतेही विशेष शिक्षक नाहीत याचा अर्थ ग्रामीण भागातील शाळांनी परिपूर्ण शिक्षण घेऊ नये का असा प्रश्न जनतेमध्ये निर्माण होत आहे. तसेच शासनाच्या या धोरणामुळे खाजगी इंग्रजी माध्यमाच्या शाळांना एक प्रकारे प्रोत्साहन देण्याचा शासनाचा मानस आहे की काय याबद्दल तीव्र भावना सर्व समाजातून गोरगरीब जनतेतून व्यक्त केली जात आहे. भारतीय राज्यघटनेने सर्वांना शिक्षणाचा समान अधिकार दिला असून याबाबत शासनाचे दायित्व नमूद केले असतानाही जाचक शासन निर्णय द्वारे ग्रामीण भागातील शिक्षण व्यवस्था संपवण्याचा प्रयत्न या शासन निर्णयामुळे होत आहे, असे निवेदनात नमुद करण्यात आले. शासनाने लवकरात लवकर शिक्षकांचे मागण्या मान्य करावेत, अन्यथा राज्यव्यापी शाळा बंद आंदोलन करण्यात येईल, याची नोंद घ्यावी, अशा इशारा देण्यात आला.

# जैन कॉन्फरन्स आत्मध्यान समितीच्या राष्ट्रीय प्रचार प्रसार मंत्रीपदी तेजस कोठारी



जामखेड – स्थानकवासी जैन समाजाची मातृसंस्था असलेल्या जैन कॉन्फरन्स दिल्लीच्या आत्मध्यान समितीच्या राष्ट्रीय प्रचार प्रसार मंत्री पदी जामखेडचे तेजस संजय कोठारी जैन यांची नियुक्ती जाहीर करण्यात आली आहे. समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष असलेले मालेगाव येथील शशिकुमार (पिंटूभाऊ) कर्नावट जैन यांनी ही नियुक्ती जाहीर केली आहे.

तेजस कोठारी यांनी संस्थेमध्ये २०१३ पासून जामखेड तालुका युवक अध्यक्ष म्हणून कार्य सुरु केले होते तेव्हा पासून मी त्यांचे काम जवळून पहिले आहे. त्यानंतर तेजस कोठारी यांनी युवक शाखेमध्ये अनेक पदावर सक्षमपणे काम केले असल्याने त्यांची ही नियुक्ती करण्यात आली.

यावेळी कर्नावट म्हणाले की, कोठारी यांचे काम मी खूप जवळून पहिले आहे कारण मी प्रदेश अध्यक्ष असताना कोठारी हे संस्थेत कार्यरत झाले, त्यांच्या कार्यक्षमा पदामुळे त्यांना सतत बढती मिळत गेली आणि आज ते संस्थेत सर्वात कमी वयात ह्या पदावर पोहोचले आहे.

यावेळी तेजस कोठारी म्हणाले, मला २०१३ साली तत्कालीन राष्ट्रीय कार्यकारणी सदस्य असलेले वैभव नहार यांनी शशिकुमार कर्नावट यांच्या नेतृत्वातील युवा शाखेत तालुका अध्यक्ष पदावर शिफारस केली. त्या नंतर श्री. कर्नावट यांच्या नेतृत्वात त्यांच्या मार्गदर्शनाने काम करत राज्यात विविध जबाबदाऱ्या पार पाडल्या. आणि आज पण आत्मध्यान सारख्या अति महत्वाच्या समितीमध्ये राष्ट्रीय स्थरावर काम करण्याची संधी त्यांनीच दिल्याने केलेल्या कामाचे चीज झाले असे वाटत आहे. इतकेच नव्हे तर २०१५ साली माझे वडिल संजय कोठारी हे चांगल्या मताने राष्ट्रीय कार्यकारणी सदस्य म्हणून निवडून आले होते. इथून पुढे देखील श्री. कर्नावट आणि वरिष्ठच्या मार्गदर्शनात संस्था घरो घरी पोहोचविण्यासाठी काम करू आणि वरिष्ठांनी टाकलेला विश्वास नक्कीच सार्थ ठरवू अशी ग्वाही देतो.



# सिंदूर ऑपरेशनचा फटाके फोडत मॉर्निंग ग्रुपच्यावतीने आनंदोत्सव साजरा

पहलगाम येथे दहशतवाद्यांनी केलेल्या हल्लूयांमध्ये २६ भारतीय पर्यटकांचा मृत्यू झाला. याचा बदला घेत भारताने ऑपरेशन सिंदुर राबवले. पाकिस्तान मधील दहशतवाद्यांचे तळ उद्ध्वस्त केले. त्यानंतर संपूर्ण भारतामध्ये एक जल्लोष पाहायला मिळाला. अहिल्यानगर शहरात देखील वाडिया पार्क क्रीडांगणावरती मॉर्निंग वॉकला येणाऱ्या नागरिकांनी जल्लोष साजरा करत भारतीय सैन्याच्या कामगिरीचे कौतुक केले. यावेळी भारत माता की जय घोषणा देत... हातात तिरंगा ध्वज धरून फटाके फोडत जल्लोष करण्यात आला. यावेळी वाडिया पार्क मॉर्निंग ग्रुपचे मनोज जैन, महेश बागल, राहुल रासकर, सचिन वाघचौरे, दादा अकोलकर, महेश झंवर, नितीन भुतारे, यश गांधी, पराग कोरडे, माऊली कोरडे, विजू गाडीळकर, विकास गाडळकर, विकास शिंदे, ऋषिकेश जाधव, चंद्रकांत डिक्कर, राजू पारेख, जामगांवकर उपस्थित होते.

# भारतीय लष्कराच्या ऑपरेशन सिंदूरचे स्वागत करुन युवासेनेचा जल्लोष

## तिरंगा फडकवून पेढे वाटप; भारत माता की जयच्या घोषणांनी परिसर दणाणला

नगर – भारतीय लष्कराने ऑपरेशन सिंदूर अंतर्गत पाकिस्तानातील दहशतवाद्यांच्या तळांवर हवाई हल्ला करून अनेक दहशतवाद्यांचा खात्मा केला. जम्मू–काश्मीरमधील पहलगाम येथे घडलेल्या भ्याड दहशतवादी हल्लूयाचा बदला म्हणून ही कारवाई करण्यात आली. या पार्श्वभूमीवर एमआयडीसी परिसरात युवासेनेच्यावतीने जल्लोष साजरा करण्यात आला.

युवासेनेने तिरंगा फडकावून परिसरात भारत माता की जय, वंदे मातरमच्या घोषणा दिल्या. पेढे वाटून आनंद साजरा करण्यात आला. देशप्रेमाचा उत्साह आणि लष्कराच्या शौर्याचे कौतुक करत अनेक कार्यकर्ते या जल्लोषात सहभागी झाले होते.



भारतीय लष्कराच्या ऑपरेशन सिंदूरचे स्वागत करुन युवासेनेच्यावतीने जल्लोष करण्यात आला.

यावेळी युवासेना जिल्हा प्रमुख योगेश गलांडे, आकाश कातोरे, उद्योजक वैभव शेटिया, नरेश शेळके, अमित बारवकर, शंकर शेळके, वैभव सुरवसे, असलम इनामदार, हर्षवर्धन देशपांडे, अजिनाथ क्षीरसाठ, स्वप्निल खराडे आदींची उपस्थिती होती.

योगेश गलांडे म्हणाले की, दहशतवाद्यांनी पहलगाम येथे २६ निष्पाप भारतीय नागरिकांचा जीव घेतला, ही घटना पूर्ण देशासाठी वेदनादायक आहे. भारतीय लष्कराने अत्यंत धाडसी आणि ठोस कारवाई करत पाकिस्तानमधील दहशतवादी तळ उध्वस्त केले, त्यासाठी संपूर्ण देशवासियांना त्यांचा अभिमान आहे. लष्कराच्या कारवाईनंतर पाकिस्तान किंवा कोणत्याही दहशतवादी संघटना भारताकडे वाकड्या नजरेने पाहण्याची हिंमत करणार नसल्याचे त्यांनी सांगितले.

# महाराष्ट्र ग्रामीण बँक आणि विदर्भ, कोकण ग्रामीण बँकेचे एकत्रीकरण

नगर – महाराष्ट्र ग्रामीण बँक आणि विदर्भ कोकण ग्रामीण बँक यांचे एकत्रीकरण होऊन नव्याने महाराष्ट्र ग्रामीण बँक स्थापन झाली आहे. या एकत्रीकरणामुळे संपूर्ण राज्यात ग्रामीण भागातील बँकिंग सेवा अधिक व्यापक आणि सशक्त होणार आहेत, अशी माहिती महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे अहिल्यानगर जिल्हा शाखा व्यवस्थापक मौलिक चावरे यांनी दिली.

मुख्य कार्यालय छत्रपती संभाजी नगर यांच्या मार्गदर्शनानुसार महाराष्ट्र ग्रामीण बँक क्षेत्रीय कार्यालय पुणे येथे महाराष्ट्र दिनी १ मे रोजी स्थापना समारंभ आयोजित केला गेला. या स्थापना समारंभाला प्रमुख अतिथी म्हणून आ.बापूसाहेब पठारे, नाबार्ड, पुणेचे जिल्हा विकास व्यवस्थापक विनीत भट, बँक ऑफ महाराष्ट्र, पुणेचे उप महा व्यवस्थापक राजेश देशमुख आणि पुणे जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक योगेश पाटील उपस्थित होते.

यावेळी उप क्षेत्रीय व्यवस्थापक प्रशांत कुलकर्णी यांनी ग्रामीण बँकेच्या विस्ताराबाबत सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमाचे अध्यक्ष क्षेत्रीय व्यवस्थापक गिरीश चिवटे यांनी बँकेला विस्तारामुळे आलेल्या नवीन जबाबदाऱ्या व आवाहन याबाबत अवगत करून दिले. कार्यक्रमासाठी ग्राहक वर्ग देखील उपस्थित होता. क्षेत्रीय कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी तसेच शहरी शाखेतील सर्व अधिकारी व कर्मचारी देखील या स्थापना कार्यक्रमास उपस्थित होते. हे एकत्रीकरण ग्रामीण बँकिंग क्षेत्रातील एक ऐतिहासिक टप्पा असून, यामुळे राज्यातील सर्वसामान्य ग्राहकांसाठी बँकिंग सेवा आणखी सुलभ होणार आहेत.

# अल्पवयीन मुलीसोबत छेडछाड करणाऱ्याला ३ वर्षे सक्तमजुरी

नगर – अल्पवयीन मुलीसोबत छेडछाड करून तिच्या सह तिच्या वडिलांना व भावाला मारहाण केल्या प्रकरणात विशेष जिल्हा न्यायाधीश श्रीमती माधुरी एच. मोरे यांनी आरोपीस दोषी धरून ३ वर्षे सक्तमजुरी व एक हजार रुपये दंड अशी शिक्षा ठोठावली. लखन सुदाम सौदागर (वय २५, रा. सावेडी, अहिल्यानगर) असे शिक्षा झालेल्या आरोपीचे नाव आहे. या प्रकरणी सरकारी वकील म्हणून अतिरीक्त सरकारी अभियोक्ता श्रीमती वैशाली राहुल राऊत यांनी काम पाहिले.

२१ फेब्रुवारी २०२० रोजी पाच वाजेच्या दरम्यान फिर्यादी, त्यांची पत्नी बाहेर गेले असताना पीडिता (वय १२) ही घरी एकटी असताना आरोपीने घरात प्रवेश करून पीडितेसोबत लज्ञा उत्पन्न होईल असे कृत्य केले. फिर्यादी हे याबाबत आरोपीस विचारणा करण्यासाठी गेला असता दोघा आरोपींनी फिर्यादी, फिर्यादीचा मुलगा व पिडीता यांना लाकडी दांडक्याने मारहाण करून शिवीगाळ करून दमदाटी केली. याबाबत तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर घटनेचा संपूर्ण तपास तात्कालीन सहा. पोलीस निरीक्षक किरण सुरसे यांनी केला व न्यायालयात आरोपीविरूध्द दोषारोपपत्र दाखल केले. या खटल्यामध्ये सरकार पक्षातर्फे एकुण सात साक्षीदार तपासण्यात आले. यामध्ये अल्पवयीन पीडित मुलगी तसेच पीडित मुलीचे वडील, पंच साक्षीदार, तपासी अधिकारी, वैद्यकीय अधिकार यांची साक्ष महत्वाची ठरली. सदर खटल्यात पैरवी अधिकारी पोलीस अंमलदार आर. डी. आडसुळ, नितीन गायकवाड यांनी सहकार्य केले.



ऑपरेशन सिंदूरचे सकल माळी समाजाच्यावतीने फटाके वाजवून जल्लोषात स्वागत करण्यात आले.

# दहशतवाद्यांचे तळ उद्ध्वस्त करून भारताने पाकिस्तानचे कंबरडे मोडले

## कॅप्टन सुधीर पुंड यांचे प्रतिपादन; ऑपरेशन सिंदूरचे सकल माळी समाजाच्यावतीने जल्लोषात स्वागत

नगर – निष्पाप हिंदूंचे पाकिस्तानी आतंकवाद्यांनी बळी घेतले आहेत. ही घटना निंदनीय आहे. पाकिस्तानला जशास तसे उत्तर देऊन भारतीय सैनिकांनी पळता भुई थोडी केली आहे. भारताने ऑपरेशन सिंदूर च्या माध्यमातून दहशतवादी अतिरेक्यांचे तळ उध्वस्त करून पाकिस्तानचे कंबरडे मोडले आहे. भारतीय सैनिकांचे सर्वत्र कौतुक होत आहे, असे प्रतिपादन कॅप्टन सुधीर पुंड यांनी केले आहे.

भारतीय सैनिकांनी ऑपरेशन सिंदूर च्या माध्यमातून पाकिस्तानच्या दहशतवादी अतिरेक्यांचे तळ उध्वस्त केले. या मोहिमेचे टिळक रोड येथील द टी हाऊस समोर सकल माळी समाजाच्या वतीने फटाके वाजवून जल्लोषात स्वागत करण्यात आले. यावेळी अध्यक्ष किशोर डागवाले, उपाध्यक्ष बाळासाहेब भुजबळ, सचिव राजेंद्र पडोळे, डॉ. रणजीत सत्रे, कॅप्टन सुधीर पुंड, विनोद पुंड, राजाराम चिपाडे, चंद्रकांत पुंड, पोपट शिंदे, दत्ता गायकवाड, दीपक खेडकर, ब्रिजिश ताठे, संजय कानडे, गणेश कोल्हे, सुरेश कावळे, भाऊसाहेब कोल्हे, बाळासाहेब गायकवाड, नितीन डागवाले, रोहित पठारे आदी उपस्थित होते.

यावेळी भारत माता की जय, पाकिस्तान मुर्दाबाद, जय श्रीराम, दूध मांगेंगे तो खीर देंगे, कश्मीर मांगेगे तो चीर देंगे अशा घोषणा देत भारतीय सैनिकांचे आत्मबल वाढवले.

# पर्यटन व्यवसायाच्या नोंदणीसाठी महाबुकींग पोर्टल सुरु

नगर – राज्याच्या पर्यटन संचालनालयाने पर्यटन क्षेत्राशी संबंधित सर्व व्यवसायांच्या नोंदणीसाठी https://mahabooking.com/ हे पोर्टल सुरू केले आहे. या पोर्टलवर व्यावसायिकांना आपल्या व्यवसायाची नि:शुल्क नोंदणी करता येणार असल्याची माहिती पर्यटन संचालनालय नाशिक विभागाच्या उपसंचालक मधुमती सरदेसाई यांनी दिली.

महाबुकींग पोर्टलवर हॉटेल्स, कृषी पर्यटन केंद्र, पर्यटन व्हिला, रिसॉर्ट, कन्वेन्शन सेंटर, वेलनेस सेंटर, इको टुरिझम, स्पेशल टूर्स, गाईड (पर्यटन मार्गदर्शक), टूर व ट्रॅव्हल्स, निवास व न्याहारी, आर्ट अँड क्राफ्ट शॉप, सोव्हेनिअर शॉप, प्रसिद्ध खाद्यपदार्थ विक्री करणारी दुकाने इत्यादी व्यावसायिक आपल्या व्यवसायाची नोंदणी करु शकतात.

या पोर्टलवर सर्व प्रकारच्या पर्यटन व्यवसायाची माहिती व फोटो इच्छुक पर्यटकांना एकाच ठिकाणी उपलब्ध होतील. या पोर्टलद्वारे पर्यटकांना बुकिंगची देखील सुविधा मिळणार असून पर्यटक व पर्यटन व्यावसायिकांना चांगल्या प्रकारचे व्यासपीठ उपलब्ध होणार आहे. तरी सर्व पर्यटन व्यवसायिकांनी आपल्या व्यवसायाची नोंदणी https://mahabooking.com/ या संकेतस्थळावर करावी. अधिक माहितीसाठी उपसंचालक कार्यालय, पर्यटन भवन, शासकीय विश्रामगृह आवार, गोल्फ क्लब मैदानजवळ, नाशिक ४२२००१ (दूरध्वनी क्रमांक ०२५३–२९९५४६४, ८३९०७३१७३७, ७५८८९५०६९७.







# युवकाच्या अपहरण व खुन प्रकरणातील फरार आरोपीला २ महिन्यानंतर पकडले

नगर – तपोवन रोडवरून तरुणाचे अपहरण करून त्याचा विळद घाटाजवळील केकताई जंगलात नेवून खून केल्या प्रकरणातील २ महिन्यांपासून फरार असलेल्या आरोपीला तोफखाना पोलिसांनी पकडले आहे. ऋत्विक उर्फ सोनु घोडके (वय १९, रा. चेतना कॉलनी, एम.आय.डी.सी.) असे या आरोपीचे नाव आहे.

तोफखाना २७ फेब्रुवारी रोजी हा खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर गुन्ह्यातील आरोपी ऋत्विक उर्फ सोनु घोडके हा गुन्हा दाखल झाले पासुन पसार होता व पोलीसांना वेळोवेळी हुलकावनी देत होता.



युवकाच्या अपहरण व खुन प्रकरणातील फरार आरोपीला २ महिन्यानंतर अटक केल्यावर त्याच्या समवेत तोफखाना पोलिसांचे पथक.

पोलीस निरीक्षक आनंद कोकरे यांना ७ मे रोजी गोपनीय माहिती मिळाली की, आरोपी ऋत्विक हा पारगांव (ता. श्रीगोंदा) येथे त्याच्या नातेवाईकाकडे येणार आहे. ही माहीती मिळाल्याने कोकरे यांनी लगेच गुन्हे शोध पथकातील पोलीस उपनिरीक्षक शैलेश पाटील, पो.हे.कॉ सुनिल चव्हाण, पो.कॉ बाळासाहेब भापसे यांच्या पथकाला कारवाईसाठी पाठविले. पोलिस पथकाने पारगांव येथे त्याचे नातेवाईकाच्या घरासमोर वेष बदलुन सापळा लावुन आरोपी ऋत्विक उर्फ सोनु घोडके यास पकडले आहे.



